रौप्य महोत्सवी स्मरणिका २०१०

# रुपेरी सावल्या

कॅलगरी मराठी असोसिएशन
२५ वर्षांची वाटचाल

**Rooperi Savalya**

**Calgary Marathi Association | 25 Years of Eventful Journey | Silver Jubilee Souvenir 2010**

# कार्यकारिणी



शर्वरी पाठक (सचिव), जयंत तोरणे (अध्यक्ष), नितीन बोरसे (उपाध्यक्ष), निरंजन देशपांडे (खजिनदार)

# अनुक्रमणिका


कार्यकारिणीचे मनोगत — २
जयंत तोरणे

मंडळाचा श्रीगणेशा — ३
शुभांगी पुरोहित

मराठा तितुका मेळवावा (पश्चिम कॅनडा संमेलन-१९८६) — ४
शुभांगी पुरोहित

जपू या मराठी! — ६
जगन्नाथ वाणी

मराठीचा इतिहास — ७
नितीन बोरसे

शांत क्षमाशील बाबूजी — ८
जगन्नाथ वाणी

वऱ्हाड निघालं लंडनला — ९
रजनी प्रसाद कान्टेटी

पु.ल.- एक निखळ माणूस — ११
जगन्नाथ वाणी

आकांक्षापुढती जिथे गगन ठेंगणे । — १४
जगन्नाथ वाणी

संजय उपाध्ये यांचे गप्पाष्टक — १९
हेमंत बेर्डे

सहल 'सिकोमी लेक' कडे ... — २०
प्रीती देशपांडे

क्षणचित्रे २०१०


# वर्षभरातील ठळक कामगिरी

- मराठीतून कार्यक्रमांची वार्तापत्रे
- ' कॅलगरी मराठी असोसिएशन' या नावाने मंडळाची पुनर्नोंदणी
- मंडळासाठी आशयगर्भ बोधचिन्हाची निवड
- सभासद संख्येची १०० च्या पुढे घोडदौड
- सभासद शुल्कात कपात - ५० डॉलर्सवरून ४० डॉलर्सवर
- १० ते १५ डॉलर्सपर्यंत सहजी परवडणारे कार्यक्रमांसाठी प्रवेश मुल्य
- Hidden Gems या चित्रपट महोत्सवातील दोन मराठी चित्रपटासाठी सभासदांना ५०% सवलत
- हिंदू सोसायटीच्या दिवाळी कार्यक्रमात मंडळातर्फे लेझीम नृत्य
- रौप्य महोत्सवानिनित्त खास कार्यक्रम 'पु.ल. - एक आनंद यात्रा'

Calgary Marathi Association

# कार्यकारिणीचे मनोगत

२१ सप्टेंबर १९८५ रोजी आपल्या मराठी मंडळाची स्थापना झाली आणि २४ ऑक्टोबर १९८५ रोजी अधिकृत नोंदणी होऊन मंडळाचे बारसे झाले. या घटनेला आता २५ वर्षे पूर्ण झाली. २५ वर्षांपूर्वी कॅलगरीत जेमतेम २८ मराठी कुटुंबे होती आणि त्यापैकी प्रत्येक कुटुंब मंडळाचे सभासद होते. साधारणपणे गतवर्षीपर्यंत ६०च्या आसपास असणारी सभासद संख्या या रौप्य महोत्सवी वर्षात आम्ही १००च्या वर नेऊन सभासद संख्येचा उच्चांक गाठला आहे. असे असले तरी अजूनही कितीतरी मराठी कुटुंबे आपल्या मंडळाचे सभासद नाहीत. त्यामुळे कॅलगरीतील सर्व मराठी बांधवांना एकत्र आणणे हा आपला सर्वांचा उद्देश सफल झालेला नाही याची आम्हाला खंत वाटते.

'मराठी मनाला आवाहन' करून आम्ही रौप्य महोत्सवी वर्षाची सुरवात केली. आपल्याशी संवाद साधतांना आम्ही कटाक्षाने मराठीचा वापर केला. कुठल्याही कार्यक्रमाची आखणी करतांना लहान मुलांचा सहभाग आणि स्थानिक कलाकारांना नृत्य व गाणी सादर करायला संधी या बार्बीवर आम्ही विशेष लक्ष दिले. गणपती उत्सवात सादर केलेले लेझीम नृत्य सर्वांच्या कौतुकाला पात्र ठरले. 'मराठा तितुका मेळवावा, महाराष्ट्र धर्म वाढवावा' या ब्रीद वाक्याला आपण भरभरून प्रतिसाद दिला आणि वर्षभरातील सर्व कार्यक्रमांना खूप मोठ्या संख्येने उपस्थित राहून आमचा उत्साह द्विगुणीत केला.

गेल्या २५ वर्षात मंडळाने साध्य केलेल्या अनेक गोष्टींचा आम्हाला सार्थ अभिमान वाटतो. सर्वात उल्लेखनीय घटना म्हणजे २००१ साली कॅलगरीत आपल्या लहानशा मंडळाने पार पाडलेले उत्तर अमेरिकेतील बृहन्महाराष्ट्र मंडळाचे दहावे द्विवार्षिक संमेलन! या खेरीज मंडळाने आयोजित केलेल्या अनेक नामवंत मराठी दिग्गजांच्या कार्यक्रमंचाही येथे उल्लेख करायला हवा. त्यात पु.ल. देशपांडे, कवी वसंत बापट, 'वऱ्हाड'कार लक्ष्मण देशपांडे, 'रामनगरी'चे राम नगरकर, 'गप्पाष्टक'कार संजय उपाध्ये, शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे आदींचा समावेश होतो. या सर्व घटनांचे सिंहावलोकन करण्यासाठी आम्ही या रौप्य महोत्सवी वर्षात एक स्मरणिका प्रकाशित करण्याचे ठरविले. आज *रुपेरी सावल्या* ही स्मरणिका आपल्या हाती देतांना आम्हाला अतिशय आनंद होत आहे. स्मरणिकेतील सर्व तपशील अत्यंत काटेकोरपणे नमूद व्हावेत यासाठी आम्ही सर्वोतोपरी प्रयत्न केले आहेत. आपणा सर्वांना ही स्मरणिका नक्कीच आवडेल याची आम्हाला खात्री आहे.

स्मरणिका तयार करण्याचे अत्यंत जिकीरीचे काम उत्तमरीत्या पार पाडल्याबद्दल कार्यकारी मंडळ डॉ. जगन्नाथ वाणींचे मन:पूर्वक आभार मानत आहे. स्मरणिकेचे सुंदर मुखपृष्ठ आणि मंडळाचे आशयगर्भ बोध चिन्ह पुण्याच्या देवेंद्र कोतवालांनी कुठलेही मानधन न घेता तयार केले आहे. त्या ऋणाचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख करायला आम्हाला अतिशय आनंद होत आहे.

सर्व मराठीप्रेमी सदस्यांच्या सहकार्याने मंडळाची २५ व्या वर्षात वाटचाल सुरू आहे. संस्थेची अशीच यशस्वी वाटचाल आणि उन्नती यासाठी असेच सहकार्य भविष्यातही लाभेल याची आम्हाला आशाच नव्हे तर खात्रीही आहे.

कॅलगरी — जयंत तोरणे, अध्यक्ष
६ नोव्हेंबर २०१० — कॅलगरी मराठी असोसिएशन

# रौप्य महोत्सवी वर्षात ...

**मकर संक्रांत** – २३ जानेवारी २०१०

भारताचा प्रजासत्ताक दिन आणि मकर संक्रत एकत्रच साजरे केलेत. 'विविधतेतून एकता' या कार्यक्रमातून भारतातील विविध प्रांतांच्या संस्कृतीची झलक दाखवली गेली. बालचमूने शिवाजी महाराजांच्या आयुष्यातले विविध प्रसंग सादर केले. नेहमीप्रमाणे नृत्य संगीताचे कार्यक्रमही सादर झाले. घरगुती पुरणपोळ्या आणि तिळगुळाने कार्यक्रमाची गोडी द्विगुणीत झाली.

**गुढी पाडवा** – २७ मार्च २०१०

या कार्यक्रमात रसिकांच्या उपस्थितीने उच्चांक गाठला. अठ्ठेचाळीस लहान मोठ्या स्थानिक कलाकारांनी विविध कार्यक्रमात भाग घेतला. घरगुती श्रीखंड पूरीच्या आस्वादाने कार्यक्रमाची रंगत वाढली.

**वनभोजन** – १० जुलै २०१०

सिकोम तलावाच्या चौपाटीवर सहलीची सुरवात उत्साहाने झाली. दुपारनंतर पाऊस सुरू झाला तरीही गाण्यांच्या भेंड्या रंगत होत्या. हवामानाने साथ न दिल्याने सहल जरा लवकर संपवावी लागली.

**गणेशोत्सव** – १८ सप्टेंबर २०१०

सुश्राव्य गाणी, आकर्षक नृत्य, विडंबन काव्य अशी करमणुकीची रेलचेल होती. सर्वात अधिक वाहवा मिळविली ती आठ मराठी कुटुंबांनी सादर केलेल्या लेझीम न्यृत्याने!

**दिवाळी** – ६ नोव्हेंबर २०१०

घरगुती लाडू, चकल्या आणि चिवड्याच्या फराळने दिवाळीच्या कार्यक्रमाची सुरवात झालेली आहे. पाहणे कलाकार सादर करीत असलेला दर्जेदार कार्यक्रम 'पु.ल. – एक आनंद यात्रा' बहारदार होईल यात शंका नाही.

# मंडळाचा श्रीगणेशा

शुभांगी पुरोहित

१९८० पर्यंत कॅलगरीमध्ये फारच थोडी मराठी कुटुंबे होती. अधून मधून जेवणाच्या निमित्ताने ही मोजकी मराठी कुटुंबे एकमेकांच्या घरी भेटत असत. त्या दरम्यान कॅलगरीत इंधन तेलाचा व्यवसाय बराच भरभराटीला आला होता. त्या निमित्ताने त्या व्यवसायातील बऱ्याच मराठी कुटुंबांचे कॅलगरीत स्थलांतर झाले. मॉंट्रीयलहून आमचे पुरोहित कुटुंबही त्याच सुमारास कॅलगरीत पोहचले. मराठी सण एकत्रित साजरे करण्याची मॉंट्रीयलमध्ये प्रथा होती. तशी प्रथा कॅलगरीतही सुरू करावी असे मी जगन्नाथ वाणी आणि इतर मित्रांना सुचविले. त्या सुचनेला चांगला प्रतिसाद मिळाला आणि बहुतांशी मराठी कुटुंबांनी एकत्र जमून पॉट–लक जेवणाच्या स्वरुपात दिवाळी साजरी करण्याची प्रथा सुरू केली.

श्री. चंद्रकान्त कपिलेश्वरी ह्यांनी पुढाकार घेऊन १९८५ साली एडमंटनमध्ये अल्बर्टा आणि सास्कॅचिवनच्या मराठी कुटुंबांचे एक यशस्वी संमेलन घडवून आणले. त्यावेळी उपस्थित असलेल्या कॅलगरीतील मराठी मंडळींनी पुढील संमेलन १९८६ साली कॅलगरीत करायची घोषणा केली. संमेलनासाठी संपूर्ण पश्चिम कॅनडा आणि अमेरिकेतील वाशिंग्टन स्टेटमधील सर्व मराठी कुटुंबांना आमंत्रण द्यायचे ठरले. संमेलनाची व्याप्ती वाढविण्यामागे मुख्य विचार होता

मराठा तितुका मेळवावा । महाराष्ट्र धर्म वाढवावा ।।

संमेलनाची अशी व्याप्ती वाढविल्याने खर्चही वाढणार होता. त्यासाठी सरकारी अनुदान मिळविण्याची कल्पना पुढे आली. परंतु मंडळाची अधिकृत नोंदणी केल्याशिवाय अनुदानासाठी अर्ज करणे शक्य नव्हते.

मराठी भाषा आणि महाराष्ट्राची संस्कृती यांचे संवर्धन व्हावे आणि त्यात पुढल्या पिढीचा सहभाग वाढावा या उद्देशाने मराठी मंडळाची स्थापना करण्यासाठी हालचाली सुरु झाल्यात. काही समविचारी मंडळी श्री. जगन्नाथ आणि कमलताई वाणींच्या घरी २१ सप्टेंबर १९८५ रोजी एकत्र जमली. निमित्त होते महाराष्ट्राच्या पारंपारिक गणेश उत्सवाचे. चर्चेअंती मंडळासाठी कॅलगरी असोसिएशन ऑफ मराठी भाषिक ह्या नावाची निवड करण्यात आली. जगन्नाथ वाणी, शुभांगी पुरोहित, दिना नाखवा, विलास जोशी आणि निलीमा परब यांनी यशवंत मणेरीकरांच्या साक्षीने मंडळाच्या स्थापनेच्या कागद पत्रावर सह्या केल्या आणि जगन्नाथ वाणी यांच्यावर पुढील कार्यवाहीची जबाबदारी सोपविली. सरकारी सही शिक्यानिशी २४ आक्टोबर १९८५ रोजी मंडळाची अधिकृत नोंदणी झाली.

अशी ही मराठी मंडळाच्या स्थापनेची कहाणी!



दिवाळी उत्सवात समुहगान – २१ ऑक्टोबर १९८९
लीना शिंदे, निलीमा मंधाने, शुभांगी पुरोहित, स्वाती फर्नांडीस, किर्ती कोटेचा, सुषमा कलगुटकर, नंदिनी सिंग

# मराठा तितुका मेळवावा
## पश्चिम कॅनडा मराठी भाषिक संमेलन – १९८६

शुभांगी पुरोहित

पश्चिम कॅनडातील सर्व मराठी लोकांना एकत्र आणून एकमेकांच्या सहवासाचा आनंद लुटायचा, विचारांची देवाण-घेवाण करायची, मराठी संस्कृतीचे वैशिष्ट्य कायम राखायचे, लहान मुलांना मराठी संस्कृतीची ओळख करुन द्यायची असे विविध हेतु मनात ठेऊन संमेलनाची तयारी सुरू झाली. २ ते ४ ऑगस्ट १९८६ असा संमेलनचा कालावधी निश्चित करण्यात आला. मंडळाची रीतसर नोंदणी झाल्यामुळे अल्बर्टाच्या सांस्कृतिक खात्याकडे संमेलनासाठी अनुदानाचा अर्ज करण्याचे ठरले आणि डॉ. जगन्नाथ वाणींच्या प्रयत्नाने मंडळाला १२०० डॉलर्सचे सरकारी अनुदान मिळाले. त्याबरोबरच अनेक सभासदांनी संमेलनासाठी प्रत्येकी १०० डॉलर्सची देणगी मंडळाला दिली. या सर्व देणगीदारांना कर सवलत मिळावी यासाठी नुकत्याच स्थापन झालेल्या महाराष्ट्र सेवा समिती ऑर्गनायझेशनलाही संमेलनात सहभागी करून घ्यायचे ठरले. सौ. मंगला जोशीने संमेलनासाठी जाहिराती मिळविण्याचे काम अंगावर घेतले. श्री. विलास जोशी ह्यांनी ते स्वत: काम करीत असलेल्या सन्कॉर कंपनीकडून ५०० डॉलर्सची भरघोस देणगी मिळविली.

आर्थिक सहाय्य निश्चित झाल्याने, प्रौढांसाठी प्रत्येकी १५ डॉलर्स व मुलांसाठी प्रत्येकी ५ डॉलर्स असे नाममात्र प्रवेश शुल्क ठेवणे शक्य झाले. सरकारी अनुदानामुळे भारतातून एकाद्या लोकप्रिय व्यक्तीला प्रमुख पाहुणे म्हणून आमंत्रण देण्याचे ठरले. डॉ. जगन्नाथ वाणींच्या संगीत क्षेत्रातील संपर्कामुळे व त्यांच्या प्रयत्नाने सुधीर फडके ह्यांनी कॅलगरीत येण्याचे आमंत्रण स्विकारले. तबल्यावर साथीसाठी शिकागोचे अरविंद देवभक्त ह्यांनी येण्याचे कबूल केले.

कॅनडाच्या चार पश्चिमेकडील प्रांतातून व अमेरीकेच्या वॉशिंग्टन प्रांतातून संमेलनासाठी मुलांसकट १९० लोक उपस्थित होते. कॅलगरीच्या सर्वच्या सर्व २८ कुटुंबांनी मोठ्या उत्साहाने संमेलनासाठी नोंदणी केली आणि 'अतिथी देवो भव' या भावनेने परगांवच्या पाहूण्यांची आपल्या घरी राहण्याची व्यवस्था करण्याचेही मोठ्या आनंदाने मान्य केले. पाहूण्यांसाठी योग्य यजमानांची निवड करण्याचे जिकरीचे काम श्री. सुधीर परब व श्री. विलास जोशी ह्यांनी मोठ्या कौशल्याने पार पाडले.

संमेलनासाठी आलेल्या १९० उपस्थितांना दोन दिवस सुग्रास भोजन देऊन खूष ठेवणे हे संमेलनाचे एक आव्हान होते. खर्च हाताबाहेर न जाऊ देता, आरती कारखानीस, शुभांगी पुरोहित, सुनंदा मणेरीकर, सुशीला नाखवा, सुनीता देशपांडे ह्या पांच जणींनी हे आव्हान स्विकारले आणि मोठ्या कौशल्याने आणि परिश्रमाने ते पूर्णत्वास नेले. चविष्ट खाद्य पदार्थ आणि भोजनाची उत्तम व्यवस्था ह्यावर पाहुणे मंडळीकडून प्रशंसेची खूपच बरसात झाली.

संमेलनाच्या कार्यक्रमाची उत्तम आखणी केलेली होती. त्यात सर्व वयोगटातील उपस्थितांसाठी काहीना काही उपक्रम उपलब्ध होते. पहिल्या दिवशी बारा वर्षाखालील बालकांसाठी 'My trip to India', बारा वर्षावरील मुलांसाठी 'Growing under two cultures' स्त्रियांसाठी 'अशा कात्रीत मी सापडते' अशी अनेक चर्चासत्रे योजली होती. कु. तेजश्री भट (कॅलगरी) व कु. मोना हेगडेकर (विनीपेग) यांनी आपल्या नृत्य नैपुण्याने प्रेक्षकांचा आनंद द्विगुणीत केला. घरकामावरून पती-पत्नी मध्ये होणाऱ्या दैनंदीन खटक्याचे श्री. आनंद व सौ. मीना परांजपे यांनी संगीत खडाष्टकात केलेल्या रुपांतरामुळे श्रोत्यांची चांगलीच करमणूक झाली. संध्याकाळी पु.ल. देशपांडे लिखित, जयश्री भट दिग्दर्शित 'सदु आणि दादू' हे नाटक स्थानिक कलाकारांनी सादर केले.

दुसऱ्या दिवशी बोनेस उद्यानात सहल आणि सहभोजन आयोजित केले होते. निसर्गाच्या कृपेने सहलीचा दिवस मोठा आल्हाददायक निघाला. सौ. शुभांगी पुरोहितांनी निरनिराळे खेळ आणि स्पर्धा आयोजित केल्या होत्या. सास्काटूनच्या मंडळींनी हिरवळीवर सुंदर लेझीम सादर केले. सुनील चौबळ, सुरेश गुर्जर, चंद्रकान्त कपिलेश्वरी ह्या त्रयीने संमेलनासाठी उपस्थित स्त्रियांच्यावर ढंगदार शिघ्रकाव्य रचून वात्रटिका सादर केल्या. जोडीला होता शेला-पागोट्याचा रंगतदार कार्यक्रम. त्यांनी श्रोत्यांची चांगलीच करमणूक केली. सहलीचा समारोप कु. उत्पला पुराहित हिने 'श्रेया कोणा आज द्यावे' या स्वत: रचलेल्या कविता वाचनाने केला.

त्या दिवशीचा संध्याकाळचा श्री. सुधीर फडके ह्यांच्या सुगम संगीताचा कार्यक्रम हा संमेलनाचा उच्चांक होता. 'झाला महार पंढरीनाथ', 'देहाची तिजोरी भक्तिचाच ठेवा' वगैरे मराठी चित्रपटातील गाणी, 'धुंद येथ मी स्वैर झोकतो' सारखी भावगीते, 'जाळीमंधी पिकली करवंद' सारख्या ढंगदार लावण्या त्यांनी पेश केल्या. श्रोतृवर्गाने टाळ्यांच्या प्रचंड क डकडाटाने प्रत्येक गाण्याला दाद देऊन आपले समाधान व्यक्त केले. शेवटी 'सागरा प्राण तळमळला' या सावरकरांच्या कवितेने बाबूजींनी मैफीलीची सांगता केली.

खास लोकाग्रहास्तव तिसऱ्या दिवशी श्री. सुधीर फडके यांनी गीत रामायणाचा कार्यक्रम सादर करण्याचे मान्य केले. आदल्या

दिवशी रात्री २ वाजेपर्यंत सुगम संगीताचा कार्यक्रम आणि सकाळी दहा वाजता गीत रामायण! बाबूजींना विश्रांती मिळालीच नव्हती. पण विश्रांतीची तमा न बाळगता रसिकांच्या प्रेमाखातर बाबूजींनी हा खाजगी स्वरुपाचा कार्यक्रम डॉ. जगन्नाथ आणि कमलताई वाणींच्या घरी उत्कृष्टपणे सादर केला. स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या जीवनावरील चित्रपट काढण्याच्या बाबूजींनी अंगीकारलेल्या कार्यासाठी उपस्थितांनी सढळ हाताने देणग्या दिल्या. त्यामुळे सावरकर चित्रपटाच्या उत्तर अमेरिकेतील निधी संकलनाच्या पहिल्या कार्यक्रमाचा मान कॅलगरी शहराला मिळाला.

ह्या संमेलनाची कायम स्वरुपी आठवण राहावी यासाठी 'स्मरणिका' प्रसिध्द करण्याचे ठरले. कु. उत्पला पुरोहितने स्मरणिकेचे मुखपृष्ठ तयार केले. दिना नाखवा, शुभांगी पुरोहित, मीना परांजपे आणि काही मंडळींनी संमेलनाचा वृत्तांत आणि त्यासंबंधित लेख लिहिण्याची जबाबदारी स्विकारली. या सर्वांच्या प्रयत्नातून एक सुंदर स्मरणिका तयार झाली. स्मरणिकेत बऱ्याच लोकांची अभिप्रायाची पत्रे छापली आहेत. नमुन्यादाखल काहींचा सारांश खाली दिला आहे.

- चकित, प्रभावित, खूषीत – हे तीन भाव जमावाच्या चेहऱ्यावर स्पष्टपणे व्यक्त होत होते. ... प्रवेश केल्यापासून कॅलगरी सोडेपर्यंत प्रत्येक क्षण आनंदाने भिजून चिंब झाला. ... कॅलगरीत अहमहमिका एकच होती, आलेल्या अथितींचे योजिल्यापेक्षा जास्त चांगले आदरातिथ्य कसे करता येईल?

  गोपाळ आणि सुनिता कुंचूर, सास्काटून

- संमेलन कसे व्हावे याचा एक आदर्श म्हणून हे संमेलन स्मरणात राहील.

  राजीव देशमुख, एडमंटन

- संमेलन फारच उत्तम व सांस्कृतिक कार्यक्रमांनी भरलेले होते. ... सर्वांच्या चेहऱ्यावर तर आनंद हसत खेळत होता.

  सौ. सुलोचना कोलारकर, अकोला

- नेत्रदीपक नृत्य, सुश्राव्य गायन, बहारदार नाटक, तांबुलासहित सुग्रास भोजन! व्वा व्वा. मंडळी इतका आखीव रेखीव दृष्ट लागण्याजोगा कार्यक्रम केलात. ... अभिनंदन!

  मीना परांजपे, व्हॅंकुव्हर

## मंडळाच्या अध्यक्षांची यादी

| | | | |
|---|---|---|---|
| १९८५ | शुभांगी पुरोहित | १९९८ | शुभांगी पुरोहित |
| १९८६ | दिना नाखवा | १९९९ | नंदिनी सिंग |
| १९८७ | जगन्नाथ वाणी | २००० | सुधीर परब |
| १९८८ | संजय शिंदे | २००१ | सुधीर परब |
| १९८९ | जमन मंधाने | २००२ | सुनिल कारखानीस |
| १९९० | (?) | २००३ | तुषार चित्रे |
| १९९१ | जगी सिंग | २००४ | शैला पंडीत |
| १९९२ | सुधीर परब | २००५ | हेमंत बेर्डे |
| १९९३ | सुरेश भट | २००६ | शुभांगी पुरोहित |
| १९९४ | अशोक कोटेचा | २००७ | सलमा गर्दे |
| १९९५ | शालिनी मोकाशी | २००८ | श्रीनिवास बक्षी |
| १९९६ | यशवंत मणेरीकर | २००९ | राजश्री ठाकुर-देसाई |
| १९९७ | दिपक मुन्शी | २०१० | जयंत तोरणे |

## कॅलगरीतील उल्लेखनिय मराठी कार्यक्रम

१९८६
सुधीर फडके (सुगम संगीत आणि गीत रामायण)
१९८७
पु.ल. आणि सुनिता देशपांडे (आनंदयात्री बोरकर)
ना.ग. गोरे (भाषण)
लक्ष्मण देशपांडे (वऱ्हाड निघालं लंडनला)
१९८८
राम नगरकर (राम नगरी)
१९९२
श्रीराम लागू , रोहिणी हत्तंगडी, निळू फुले, मोहन गोखले आणि चारूशिला साबळे (कमला नाटक)
१९९३
वसंत बापट (काव्य वाचन)
२०००
बाबासाहेब पुरंदरे (शिवचरीत्र)
२००१
अभय बंग (सेवाग्राम ते शोधग्राम)
विजय भटकर (महाराष्ट्राची परंपरा)
सुषमा देशपांडे (व्हय, मी सावित्री !)
२००५
संजय उपाध्ये (गप्पाष्टक)
२००७
सुधीर गाडगीळ (मुलखावेगळी माणसे !)

# जपू या मराठी!

जगन्नाथ वाणी

शुभांगीची दोन्ही मुले, उत्पला आणि अपार, उत्तम मराठी बोलतात आणि इतकेच नव्हे तर लिहितात आणि वाचतातही. उत्पला तर मराठीत कविताही करते. १९८६ साली पश्चिम कॅनडा मराठी अधिवेशनाचा समारोप उत्पलाच्या 'श्रेय कोणा आज द्यावे' या कवितेने झाला. दर वर्षी भारतातून मराठीची इयत्तावार पाठ्यपुस्तके मागवून शुभांगीने आपल्या मुलांकडून मराठीचा पध्दतशीर इयत्तावार अभ्यास करवून घेतला. परिणामी उत्पलाने १२वी पर्यंत मराठीचे शिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केले. १९८७ साली कॅलगरीतील स्कूल फॉर इंडियन लँग्वेजेस अँड आर्टस या संस्थेने चालविलेल्या शाळेत उत्पला मराठीचे वर्ग घ्यायची.

आपल्या मुलांना दिलेली संधी कॅलगरीतील इतर मराठी कुटुंबातील मुलांनाही द्यावी ही कल्पना अनेक वर्षे शुभांगीच्या मनात घोळत होती. २००२ च्या सुमारास बरीच मराठी कुटुंबे कॅलगरीत वास्तव्याला आल्यामुळे शुभांगीला मराठी शाळेची कल्पना प्रत्यक्षात आणता आली आणि त्या वर्षी तिने आपल्या घरी विनाशुल्क मराठीची शाळा सुरू केली. दर रविवारी सकाळी ही शाळा भरते. दरवर्षी मुलांची संख्या वाढतच गेली आणि त्यानुसार वर्गही वाढले. यंदा १५ मुले शाळेत आहे. शुभांगीच्या मनोरंजक शिकवण्याच्या पध्दतीमुळे मुले उत्सुकतेने रविवारची वाट बघत असतात.



शुभांगीताईंच्या मार्गदर्शनाखाली एकाग्र चित्ताने मराठीचा अभ्यास

शुभांगीच्या मराठी शाळेबद्दल किरण कोल्हटकरांनी आपली प्रतिक्रया पुढील शब्दात व्यक्त केली. 'टोकीयोत असतांना तेथल्या मराठी मंडळाने चालविलेल्या संस्कार वर्गात आमची मुले जात असत. २००२ साली कॅलगरीत आल्यानंतर तसाच उपक्रम येथल्या मंडळात सुरु करण्याची कल्पना सुचेताने मंडळाच्या कार्यकारिणीपुढे मांडली. शुभांगीताईंनी ती प्रत्यक्षात आणली आणि ती आजतागायत चालू ठेवली आहे. आमची मुले, सिध्दार्थ आणि कुणाल, त्यांच्या शाळेत दोन वर्षे शिकलीत. सिध्दार्थ आता मराठी वाचूही शकतो.'

शुभांगीच्या शिकविण्याच्या पध्दतीवर तिची एक विद्यार्थीनी अनुष्का गर्दे हीचे भाष्य खूपच बोलके आहे. ती म्हणते 'जवळ जवळ चार वर्षे मी मराठी शाळेत नियमाने जात असे कारण शुभांगी मावशी नेहमीच काहीतरी नवीन आणि उत्सुकता वाढविणाऱ्या गोष्टी शिकवत असे. आमचे शिक्षण नुसते पुस्तकी नव्हते. निरनिराळे खेळ वापरून आमचा अभ्यास मनोरंजक करण्यात मावशी अगदी तरबेज होती. शिकवण्यासोबत मावशी रुचकर मराठी खाद्यपदार्थही आम्हाला द्यायची. उपमा, सांजा, भोपळ्याच्या पुऱ्या, साबुदाण्याचे वडे, लाडू अशा निरनिराळ्या पदार्थांची चव आजही मला आठवते.'

शिल्पा यादव यांनी मराठी शाळेबद्दलचा आपला अनुभव मोठ्या अगत्याने कळविला आहे. त्या लिहितात, 'कॅलगरीत पोहोचल्यानंतरचे सुरवातीचे दिवस अजूनही मला आठवतात. कोणीही मराठी माणसे मला माहित नव्हती. येथल्या इंग्रजी वातावरणात माझ्या मुली मराठी कसे शिकणार हा प्रश्न माझ्या पुढे होता. मला मराठी आवडते आणि माझ्या मुलींनीही ती भाषा शिकावी आणि मराठीतील समृध्द साहित्य वाचावे असे मला मनापासून वाटत होते. अशा मन:स्थितीत असतांना अचानक मला कुणीतरी शुभांगीताईंच्या मराठी शाळेबद्दल सांगितले आणि त्या सोबत एक महत्वाची सुचनाही केली: शुभांगीताई मुलांच्या उपस्थितीबाबतीत कमालीच्या काटेकोर आहेत, मुलांनी शुल्लक कारणासाठी गैरहजर राहिलेले त्यांना अजिबात चालत नाही. जरा भीतभीतच मी शुभांगीताईंना फोन केला. आपल्या नियमाबाबत त्या अगदी ठाम होत्या. परंतु त्यांच्या मराठी शिकवण्याच्या तळमळीचीही मला जाणीव झाली. आपल्या व्यस्त दैनंदिन कार्यक्रमातून त्या वेळ काढतात. सहाजिकच पालकांनीही शाळेची शिस्त पाळायला हवी ही त्यांची अपेक्षा रास्तच आहे.'

'वरील सर्व गोष्टी लक्षात घेऊन २००७ साली मी आरोहीला त्यांच्या शाळेत दाखल केले. आरोही आता मराठी उत्तम बोलायला, लिहायला आणि वाचायला लागली आहे. मराठीतील आपल्या प्रगतीबद्दल तिला खूप समाधान वाटते. मराठी काव्याचीही तिला गोडी निर्माण झाली आहे. हे सर्व शुभांगीताईंच्या प्रयत्नाने साध्य झाले. मराठी भाषा शिकायला आणि शिकवायलाही तशी सोपी नाही. भारताबाहेर असलेल्या मुलांना मराठी शिकवणे हे खरे तर एक आव्हानच असते. आरोही बऱ्याच वर्षांपासून भारताबाहेर आहे. सहाजिकच तिला भारतीय सणावारांची अथवा चालीरीतींची काहीच कल्पना नाही. ह्या गोष्टी तिला समजावून सांगणे जरा कठीणच आहे. परंतु शुभांगीताई हे सहजगत्या करू शकतात.'

# मराठीचा इतिहास

नितीन बोरसे

इतिहासाचे अवजड ओझे
डोक्यावर घेऊन ना नाचा
करा पदस्थल त्याचे आणिक
चढून त्यावर भविष्य वाचा

कुठल्याही प्रदेशाचा, संस्थेचा,संस्कृतीचा अथवा भाषेचा इतिहास विंदा करंदीकरांनी लिहिल्याप्रमाणे भविष्याची चाहूल घेण्यासाठी उपयोगी येतो. आपल्या संस्थेच्या २५ वर्षांच्या इतिहासाचा मागोवा या स्मरणिकेद्वारे घेतांना आपल्या भाषेच्या दीड हजार वर्षांच्या इतिहासावर थोडी नजर टाकण्यास हरकत नसावी जगातल्या नऊ कोटी लोकांची मातृभाषा मराठी आहे. या दृष्टीने मराठीचा क्रमांक सर्व भाषांमध्ये पंधरावा लागतो.

मराठीच्या उगमाविषयी संशोधकामध्ये एकमत नाही. महाराष्ट्री, कन्नड, तेलगू, प्राकृत, मागधी, तमिळ अशा अनेक भाषांचा मराठीशी संबंध जोडता येतो. तमिळ आणि जुनी मराठी (संत ज्ञानेश्वरांच्या काळातील) ह्यांचे पदक्रम, व्याकरण, वाक्यरचना ह्यात खूपच साम्य आहे. संस्कृत, प्राकृत, अपभ्रंश, महाराष्ट्री असे बदल होत मराठी भाषा बनत गेली असाही एक विचारप्रवाह आहे. अनेक मराठी शब्द, संस्कृत, शब्दापासून थोडाफार बदल होऊन बनले आहेत. ऋ, ई, औ हे वर्ण संस्कृतमधून मराठीत आले. अर्थातच याशिवाय मराठी भाषेने पाली, अर्धमागधी, हिंदी, फारसी, अरबी, तुर्की, इंग्रजी, पोर्तुगीज, गुजराथी, ओरीया, बंगाली भाषांमधूनही शब्द घेतले आहेत.

मराठीच्या अभ्यासकांसाठी साताऱ्याला सापडलेला इ.स. ७३९ चा विजयादित्याचा ताम्रपट, इ.स. ९८३ चा श्रवणबेळगोळला सापडलेला गोमतेश्वराचा शिलालेख, इ.स.१२८९ चा उनकेश्वरचा शिलालेख महत्त्वाचे आहेत. इ. स. ८५९ च्या धर्मोपदेशमाला या ग्रंथात मराठी भाषेचा उल्लेख आहे. मराठी भाषा कशी आहे हे दोन ओळीत सांगितले आहे.

सललयि-पय-सचारा पयडियमाणा सुवण्णरयणेल्ला ।
मरहठय भासा कामिणी य अडवीय रेहती ।।

'मराठी भाषा सुंदर कामिनीप्रमाणे असून ती अटवीप्रमाणे सुंदर गतीची, मदनाने भरलेली आणि चांगल्या वर्णाची आहे' असे मराठी भाषेचे कौतुक केलेले आहे. मराठी भाषा लोकांना आवडते, कारण ती काळाच्या ओघात स्वत:ला बदलवून घेते.

महानुभाव पंथाच्या चक्रधर स्वामींचे शिष्य म्हाइंभट यांनी १२८५ साली लिहिलेला लीळाचरित्र हा ग्रंथ मराठीतील पहिले साहित्य मानले जाते. काहींच्या मते यादव काळात (इ.स.८५०-१३३४) नाथपंथीय कवी मुकुंदराज यांनी लिहिलेला विवेकसिंधू हा मराठीतील आद्यग्रंथ आहे. देवगिरीच्या (आजचे दौलताबाद) यादवांनी मराठी भाषेला राजभाषेचा दर्जा प्राप्त करून दिला या काळात मराठीत ज्योतीषशास्त्र, आयुर्वेद, पुराणे, वेदांत अशा अनेक विषयांवर ग्रंथ लिहिले गेले. नलोपाख्यान, रुख्मिणी स्वयंवर, श्रीपतीचे ज्योतीषमाला हे ग्रंथ याच काळात लिहिले गेले.

मराठीच्या लोकप्रियतेमध्ये वारकरी संप्रदायाचा सिंहाचा वाटा आहे. आर्य, द्रविड, वैष्णव आणि शैव सर्वांनाच पंढरपूरचा विठोबा आपला वाटतो. संत ज्ञानेश्वर (१२७१-९३) यांच्या अमृतानुभव आणि ज्ञानेश्वरीबद्दल ठाऊक नसलेला मराठी विरळाच.

मऱ्हाटीयेचा नगरी । ब्रह्मविद्येचा सुकाळूकरी ।
घेणे देणे सुखाच वेऱ्ही । हो देई जगा ।
माझा मऱ्हाटीची बोलू कवतिके ।
परि अमृताते ही पैजा जिंके ।
ऐसी अक्षरेचि रसिके मेळविन ।।

संत नामदेव (१२७०-१३५०) विसोबा खेचर, जनाबाई, सावता माळी, गोरोबा कुंभार, नरहरी सोनार, चोखा मेळा, कान्होपात्रा या सर्व संत मंडळींनी वारकरी संप्रदाय आणि मराठीची पताका फडकवत ठेवली.

इ.स. १३५० ते १५५० या काळात महाराष्ट्रात दुष्काळ, परकीय आक्रमण यांनी धुमाकुळ घातला. तरीही या काळात संत एकनाथ (१५४८-९९) आणि संत तुकाराम (१५८८-१६४९) यांनी अनेक भक्तीपर रचना करून मराठी भाषा जागृत ठेवली. एकनाथांनी २०००० ओव्यांचे भावार्थ रामायण लिहीले. मुक्तेश्वरांनी (१६०८-६०) महाभारताचे मराठीत भाषांतर केले. वामन पंडित, रघुनाथ पंडित, श्रीधर, मयूर पंडित (मोरोपंत) यांनी १६ व्या आणि १७ व्या शतकात अनेक रचना थोड्याशा संस्कृत प्रचूर मराठीमध्ये केल्या. या उलट संत रामदासांनी (१६०८-८२) जन- सामान्यांना जास्त जवळचे वाटणारे दासबोध, मनाचे श्लोक प्रचलीत केले.

त्यानंतरच्या काळात मराठी कविता शाहीरांच्या पोवाड्यांमध्ये आणि लावण्यांमध्ये फुलली. शाहीर अग्नीदास आणि तुळशीदास यांनी शिवाजी महाराजांचे पोवाडे लिहिले. शाहीर होनाजी बाळा यांचे, 'सांगा मुकुंद कुणी हा पाहिला', 'लटपट लटपट तुझे चालणे', 'घनश्याम सुंदरा', या विविध प्रकारच्या रचना कुणालाबरे माहीत नसतील.
(पान १९ वर)

# शांत क्षमाशील बाबूजी

जगन्नाथ वाणी

टोरांटोत १९८५ साली भरलेले बृहन्महाराष्ट्र मंडळाचं दुसरं अधिवेशन नुकतेच संपलं होतं आणि १९८७ साली न्यू जर्सी येथे आयोजित केलेल्या तिसऱ्या अधिवेशनाची नांदीही झाली होती. इच्छा असूनही पश्चिम कॅनडातील मराठी भाषिकांना बृहन्महाराष्ट्र मंडळांच्या या संमेलनासाठी इतक्या दूर जाणं आर्थिकदृष्ट्या परवडण्यासारखं नव्हतं. हे लक्षात घेऊन कॅलगरीच्या मराठी मंडळींनी १९८६ साली पश्चिम कॅनडातील मराठी मंडळींचं अधिवेशन भरविण्याची योजना आखली. प्रमुख पाहुणे म्हणून बाबुजी (सुधीर फडके) यांना निमंत्रण गेलं आणि बाबुजींनी कुठल्याही प्रकारचे आढेवेढे न घेता निमंत्रणाचा लगेच स्वीकार केला. बाबुजींनी निमंत्रण स्वीकारल्याने अधिवेशनासाठी अर्थातच दर्जेदार गाण्याचा कार्यक्रम ठरला आणि प्रमुख पाहुणा म्हणूनही बाबुजींसारखे एक निरलस, तेजस्वी व्यक्तिमत्व आम्हाला लाभलं.

बाबूजींचा सुगम संगीताचा कार्यक्रम ३ ऑगस्टला रात्री ८ वाजता ठरला होता. श्रोत्यांनी ७ वाजल्यापासूनच थिएटरवर गर्दी केली होती. उत्सुक श्रोत्यांनी थिएटर अगदी फुलून गेलं होतं. 'देहाची तिजोरी भक्तिचाच ठेवा', 'धुंद येथे मी स्वैर झोकितो मद्याचे प्याले' अशा अनेक लोकप्रिय गाण्यांनी कार्यक्रमाला रंग चढत होता. बाबूजींचे 'झाला महार पंढरीनाथ' हे गाणं ऐकावं अशी मला अनिवार्य इच्छा झाली आणि मी बाबूजींना तशी विनंती केली. माझ्या विनंतीमुळे त्यांची मोठी पंचाईत झाली. परकीयांच्या गुलामगिरीचा भपकारा या गाण्यातून येतो म्हणून हे गाणं म्हणू नये असे बाबुजींनी ठरविलं होतं. आपला हा निर्णय ते कटाक्षाने पाळत असत. तरीही माझ्या विनंतीचा अव्हेर त्यांनी केला नाही. माझ्या विनंतीचा मान राखण्यासाठी आपली भूमिका अतिशय सौम्य शब्दात प्रथम त्यांनी विशद केली आणि त्यानंतर अगदी दिलखुलासपणे त्यांनी ते गाणं पेश केलं. आपल्या विचारसरणीचा बागुलबुवा न करता इतरांच्या इच्छेचा मान राखण्याचं सौजन्य अभावानेच जाणवतं. याबाबतीत बाबूजींनी दाखविलेला मनाचा मोठेपणा खरोखरच अद्वितीय होता.

कॅलगरी असोसिएशन ऑफ मराठी भाषिक्सच्या उत्साही कार्यकर्त्यांनी बाबूजींच्या पूर्वपरवानगीशिवाय या रंगलेल्या कार्यक्रमाचे ध्वनिमुद्रण केलं. दुसऱ्या दिवशी ध्वनिमुद्रणाबद्दलची हकीकत मी त्यांच्या कानावर घातली. वाटलं होतं, पूर्वपरवानगीशिवाय ध्वनिमुद्रण केलं म्हणून बाबूजी रागवतील. पण तसं काहीच झालं नाही. अगदी शांतपणे 'ध्वनिमुद्रण करायला नको होते' एवढीच त्यांनी टिप्पणी केली. कार्यक्रमाच्या ध्वनिमुद्रणाबाबत कलाकार मंडळी किती काटेकोर आणि कठोर असतात हे मी रागमाला म्युझिक सोसायटीच्या अनेक कार्यक्रमातून बघितलं होतं. त्या पार्श्वभूमीवर बाबूजींचा क्षमाशील स्वभाव माझ्या मनावर खूप खोलवर परिणाम करून गेला.

कॅलगरीला येण्यापूर्वी बाबूजींनी सावरकर दर्शन प्रतिष्ठानची भारतात नुकतीच स्थापना केली होती. त्या धर्तीवर सावरकर चित्रपटाच्या निधी संकलनासाठी उत्तर अमेरिकेत इंडिया हेरिटेज फाऊंडेशन स्थापण्याचे बाबूजींचे प्रयत्न सुरू होते. या फाऊंडेशनसाठी उत्तर अमेरिकेतील निधी संकलनाच्या पहिल्या कार्यक्रमाचा मान कॅलगरी शहराला मिळाला. बाबूजींनी ४ ऑगस्ट रोजी रसिकांच्या आग्रहाखातर गीतरामायणाचा कार्यक्रम सादर केला. आदल्या दिवशीचा कार्यक्रम पहाटे दोन वाजेपर्यंत चालल्याने बाबूजींना विश्रांतीची नितांत गरज होती. तरीही रसिकांच्या प्रेमाला नकार देणं त्यांना जमलं नाही. कार्यक्रम खासगी स्वरूपाचा असल्याने प्रवेशमूल्याची अट नव्हती. ऐच्छिक देणग्यातून जमलेले सर्व मानधन बाबूजींनी सावरकर चित्रपटासाठी दिल्याचं जाहीर केलं.



कॅलगरीमध्ये झालेली ही ओळख पुढे अधिक दृढ होत गेली. या ओळखीला पुढे जिवलग स्नेहाची पालवी फुटली. बाबूजींनी मला अगदी सहज आपल्या मित्रपरिवारात सहभागी करून घेतलं. नंतर 'वाणीकाका' या नात्याने मी फडक्यांच्या कुटुंबाशी जोडला गेलो. श्रीधरसारखा गुणी कलाकार आणि त्याची चित्रासारखी जबाबदार कर्तव्यदक्ष पत्नी यांच्याशीही माझी चांगलीच मैत्री झाली. साहजिकच बाबूजी गेल्याचं कळलं तेव्हा मन सुन्न झालं. 'दोन दिसांची रंगत संगत, दोन दिसांची नाती' अशी समजूत बाबूजीच घालत आले होते. तरीही हजारो मैलांवर राहणाऱ्या माझ्यासारख्या माणसाच्या मनातही अगणित स्मृती ठेवून गेलेल्या या राजस पाखराच्या वियोगाने जीव अजूनही कळवळतोच.

# वऱ्हाड निघालं लंडनला

रजनी प्रसाद कान्टेटी

पश्चिम कॅनडा मराठी भाषिकांचे तिसरे संमेलन एक व दोन ऑगस्ट १९८७ ला एडमंटन येथे अतिशय धुमधडाक्याने व यशस्वीरीत्या पार पडले. कॅलगरीच्या मराठी मंडळाचे त्यावेळचे अध्यक्ष डॉ. जगन्नाथ वाणी यांनी त्यासाठी एक खास नाटक महाराष्ट्रातून निमंत्रित केले होते आणि ते या संमेलनाचे प्रमुख आकर्षण होते. नाटकाचे नाव होते 'वऱ्हाड निघालं लंडनला'. प्रा. लक्ष्मणराव देशपांडे यांचं हे एकपात्री नाटक त्यावेळी महाराष्ट्रात खूपच लोकप्रिय होते. ह्या एकपात्री नाटकाचा हा ८१५ क्रमांकाचा प्रयोग होता. प्रयोगाच्या क्रमांकावरूनच त्याच्या लोकप्रियतेची प्रचिती येते. लक्ष्मणराव देशपांडे हे औरंगाबादचे रहिवासी. औरंगाबाद म्हणजे नीलिमा मंधानीच माहेर. त्यामुळे त्यांच्या आदरातिथ्यची सर्व जबाबदारी मंधानी कुटुंबियांनी आनंदाने स्विकारली.

अल्बर्टाच्या मराठी मंडळींना संमेलनाच्या निमित्ताने हे नाटक पाहण्याचा अपूर्व योग आला. संमेलनाच्या आदल्या दिवशी एडमंटनमध्ये जरी चक्रीवादळाने धुमाकूळ घातला होता, तरीसुद्धा कॅलगरीची बहुतांशी मंडळी उत्साहाने उपस्थित होती. नाटकाच्या प्रयोगाला सुरवात झाली आणि काही क्षणातच सर्व श्रोते मंडळी तन मन धन विसरून मंत्रमुग्ध झाली. लक्ष्मणरावांनी सुरवातीच्या प्रस्तावनेत सांगितले की, 'तुम्ही फक्त खेड्यांत आहांत अशी कल्पना करा, लंडनला पोहचविण्याची जबाबदारी माझी.' आणि अक्षरश: त्यांनी हे म्हणणे खरे करून दाखविले. कल्पनेच्या वावरातून त्यांनी प्रेक्षकांना वास्तवतेचे दर्शन घडविले. अतिशयोक्तिपूर्ण अभिनयातून त्यांनी सर्वासमोर खेड्याचे रोजचे व्यवहारी जीवन, माणसे, त्यांचे वागणे, बोलणे, चालणे, त्यांच्या सवयी ह्यांचे हुबेहूब चित्र उभे केले. क्षणाक्षणाला आपल्या विनोदाने व अभिनयाने त्यांनी प्रेक्षकांना हसविले तसेच काही प्रसंगी गंभीरही बनविले. या नाटकाचा प्रभाव प्रेक्षकावर इतका झाला होता की, मनाने प्रत्येक जण आपलं कॅनडातील वास्तव्य विसरून आधी मराठवाड्यातील एका छोट्याशा खेड्यात आणि नंतर लंडनला पोहोचला होता. एखाद्या जादूगाराने जशी जादूची कांडी फिरवावी व इकडची दुनिया तिकडे करावी असाच काहीसा तो प्रकार होता. लंडनला लग्नाला जाऊन आल्यावर सुद्धा काही वेळाने आपण हॉलमध्येच बसलो आहोत ही जाणीव होते. तसे पाहिले असता नाटकाचा विषयच अतिशयोक्तीचा आहे. परंतु तरीही अगदी साध्या बोलीने व सहज अभिनयाने लक्ष्मणराव आपल्याला लंडनला नेतात ह्यांतच त्यांच्या नाटकाच्या यशस्वीतेचे गमक आहे.

या नाटकाचं कथानक अतिशय साधं आहे. काशीनाथ हा एका खेड्यातील गर्भश्रीमंत शेतकऱ्याचा (बाप्पांचा) एकुलता एक मुलगा लंडनला शिकायला जातो व तिथल्या एका गोऱ्या मुलीशी लग्न करण्याची इच्छा आपल्या बाप्पाजवळ प्रकट करतो. घरातल्या सगळ्यांचंच धाबं दणाणतं. शेवटी आपला मुलगा त्याच्या जीवाचं काही बर-वाईट करेल या भीतीने कर्मठ बाप्पा विरघळतो व लग्नाची बोलणी करण्यासाठी संमती देतो. खेड्यातील काशीनाथचे वडील बाप्पा व लंडनचे काशीनाथचे भावी सासरे जॉन डेसली यांची गाठभेट घडवून आणण्याचा एकमेव दुवा म्हणजे काशीनाथचा चुलत भाऊ बबन्या. कारण बबन्याशिवय त्या घरात इंग्रजीचे किडुक मिडूक ज्ञान कुणालाही नसते. तेव्हा काशीनाथच्या संपूर्ण लग्नाची जबाबदारी नॉनमॅट्रिक बबन्याच्या इंग्रजीवर पडते. शेवटी एकदाचा जॉनराव येतो व बाप्पाने सांगितलेल्या सर्व अटी मान्य करून लग्न लंडनला करायचं ठरतं, आणि मग संपूर्ण वऱ्हाड लंडनला जायच्या कल्पनेने हुरळून जातं. तेव्हापासून ते वऱ्हाड लंडनला जाऊन लग्न होईपर्यंत काय काय विनोदी प्रसंग घडतात याचं सुंदर वर्णन या नाटकात पहायला मिळत.

कर्मठ बाप्पा, बायकी बबन्या, पाश्चात्त्य झालेला काशीनाथ, जॉनराव, काशीनाथची आई व घरातली बरीचशी लहान मुले ही सर्व पात्रे लक्ष्मणरावांनी आपल्या अभिनय कौशल्याने इतक्या जिवंतपणे उभी केली आहेत की आपण त्यातल्या एखाद्या पात्राला विसरायचं जरी ठरवलं तरी विसरू शकत नाही. गावात पहिल्यांदा एखादा गोरा माणूस आला की त्याच्याविषयी वाटणारं आकर्षण व त्यावर होणारी प्रतिक्रिया, शहरात पहिल्यांदाच आल्यावर तिथल्या विविध गोष्टींविषयी वाटणारी उत्सुकता असे अनेक खेड्यातल्या लोकांच्या स्वभावाचे पैलू याचं त्यांनी अतिशय सूक्ष्म निरीक्षण करून मोठ्या कुशलतेने या नाटकात सादर केले आहेत. विशेषत: एकत्र कुटुंबात कामावरून होणारी बायकांची धुसफूस, बारीक सारीक गोष्टीतले

हेवेदावे या रोजच्या आयुष्यातील साध्या साध्या गोष्टी मोठ्या खुबीने त्यांनी प्रेक्षकासमोर उभ्या केल्या.

उत्तम अभिनय, आकर्षक संवाद व खुसखुशीत विनोद असा त्रिवेणी संगम या नाटकात आढळतो. नाटकाचे अडीच तास हास्यकल्लोळात कसे भर्रकन निघून जातात हे समजतच नाही व त्याचा आनंद मनमुराद लुटल्याचं समाधान प्रत्येकाच्या चेहऱ्यावर दिसतं पण हे सर्व पाहिल्यावर मनात एक शंका येते की हा विषय कितपत वास्तवतेला धरून आहे ! तरीसुद्धा आजकालच्या धकाधकीच्या जीवनात निर्भेळ करमणूक व समाधान याच्यापेक्षा आणखी कोणती अपेक्षा आपण एखाद्या चांगल्या नाटकापासून करावी ! त्या दृष्टीने लक्ष्मणराव देशपांड्याचा हा एक पात्री प्रयोग म्हणजे केवळ डोळ्यांनाच व कानालाच नव्हे तर मनाला सुद्धा मेजवानी होती.

'वऱ्हाड निघालं लंडनला' या नाटकाचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे या नाटकाचा संपूर्ण कर्ता–करविता – लेखक, दिग्दर्शक, कलाकार, सादरकर्ता सर्व काही – स्वत: लक्ष्मणराव देशपांडे आहेत. बालपणापासून असलेली नाटकाची आवड, मुळातच असलेली अभिनयाची जाण, आणि बालगंधर्वांसारख्या महान व्यक्तींकडून मिळालेलं प्रोत्साहन व आशीर्वाद, या सर्वांमुळे प्रा. लक्ष्मणराव देशपांड्यांनी नाट्यक्षेत्रात उच्च शिक्षण घेऊन आपलं आयुष्य त्याला वाहून घ्यायचं ठरवलं. त्यांनी लोकनाट्य व प्रायोगिक नाट्य हे दोन विषय घेऊन त्यात पीएच्.डी. प्राप्त केली. मराठवाडा विद्यापीठात नाट्यविभागाचे प्रमुख म्हणून त्यांनी बरीच वर्षे काम केले. त्यांचा खेड्यातला एक मित्र परदेशात थोडे दिवसांसाठी जाऊन येतो. आल्यावर त्याच्या बोलण्यात वागण्यात झालेला वरपांगी बदल व त्यावर त्याच्या घरातल्या लोकांच्या प्रतिक्रिया या छोट्याशा विषयातून 'वऱ्हाड निघालं लंडनला' याचा उगम झालेला आहे.



श्री. व सौ. लक्ष्मण देशपांडे यांच्या समवेत जमन आणि निलीमा मंधाने

# पु.ल.– एक निखळ माणूस

जगन्नाथ वाणी

जुलै १९८७ मध्ये न्युजर्सी, न्युयॉर्क आणि फिलाडेल्फीया यांनी संयुक्तरीत्या आयोजित केलेल्या बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या अधिवेशनासाठी अध्यक्ष म्हणून पु. ल. येणार हे कळल्याबरोबर अधिवेशनानंतर त्यांनी कॅलगरीला यावं असं आग्रहाचं निमंत्रण आम्ही त्यांना दिलं. त्यांनी ते स्वीकारलं. पु.ल., सुनीताबाई, पु.लं.चे मेहुणे श्रद्धानंद ठाकूर, आणि त्यांच्या पत्नी सौ. निर्मलाताई असे चौघंजण येणार आणि माझ्या घरी राहणार असं ठरलं.

व्हँकूवर ते कॅलगरी हा रॉकीज पर्वतातून जाणारा आगगाडीचा प्रवास खूपच रम्य आहे. म्हणून असा प्रवास करून मग कॅलगरीला पोहचायचं असं त्या चौघांनी ठरवलं. पण त्यांच्या एका भरोशाच्या मित्राने योग्य वेळी त्यासाठीची तिकीटं खरेदी न केल्याने त्यांना तो बेत रद्द करावा लागला. पु.लं.चा फारच हिरमोड झाला आणि त्यामुळे ठरलेल्या तारखेच्या दोन दिवस आधीच विमानाने ते कॅलगरीला पोहचतील असा निरोप आला. एकीकडे त्यांचा सहवास आणखी दोन दिवस मिळणार याचा आनंद असला तरी कमलिनीच्या आजारपणामुळे पाहुण्यांच्या आगमनातला हा बदल ती कसा स्वीकारेल, त्यांचं आदरातिथ्य नीट होईल का, अशा विचारांनी मी धास्तावलो होतो. पण सुदैवाने, सगळं काही ठीकठाक झालं. त्या सात आठ दिवसांत पु.लं.चा हजरजबाबीपणा, त्यांचे कलागुण याबरोबरच त्यांची तत्त्वनिष्ठा, संवेदनशीलता, गुणग्राहकता, आपुलकी, माणुसकी अशा त्यांच्या विविध पैलूंचं दर्शन झालं आणि त्यांचं माणूसपण हृदयात कायमच कोरलं गेलं.

त्या चौघांना सगळीकडे हिंडवायचं म्हणजे खर्च होणारच म्हणून मी आधीच बँकेतून ५००–६०० डॉलर्स काढून ठेवले होते. पण कोणतंही प्रेक्षणीय स्थळ बघायला गेलो की मी गाडी थांबवताक्षणी डॉ. ठाकूर पटकन गाडीतून उतरून तिकीटं काढून आणायचे. मी त्यांना म्हटलं, ‘अहो, तुम्ही मला काही करायची संधीच देत नाही.’ पु.ल. म्हणाले, ‘असं कसं, तुम्ही आमच्यासाठी एवढी ३–४ दिवसांची सुट्टी काढलीत. तुमच्या गाडीतून आम्हाला हिंडवताय, यापेक्षा जास्त काय करायला पाहिजे?’



स्मिता नाखवा, अंकुश नाखवा, सुनीता देशपांडे, वाणी मातोश्री, जगन्नाथ वाणी, वृषाली नाखवा, कमलिनी वाणी, पु.ल. देशपांडे

पु.लं.च्या वास्तव्यादरम्यान माझी अशिक्षित आईही माझ्याकडे आलेली होती. लिहिता वाचता येत नसलं तरी आईला बरीच जुनी गाणी पाठ होती. तिचा आवाजही बऱ्यापैकी होता. आपली गाणी इतरांना ऐकवण्याची तिला भारी हौस. संभाव्य धोका लक्षात घेऊन ‘पु.लं.ना तुझी गाणीबिणी ऐकवून उगाच सतावू नकोस.’ असे मी तिला बजावलं होतं. आई माझ्या सूचनेचे पालन करील असं मला वाटलं होतं. परंतु माझ्या सांगण्यापेक्षा तिची गाणं म्हणून दाखविण्याची ऊर्मीच वरचढ ठरली. मी आसपास नसताना तिने पु.लं.ना आपली गाणी ऐकवलीच. कॅनडातील प्रेक्षणीय सरोवर, लेक लुईस, बघायला गेलो असतांना पु.लं.नी मला तिचं कौतुक सांगितलं. मी आश्चर्य व्यक्त केलं. कारण आई माझे ऐकेल असं मला वाटलं होतं. पु.ल. तिच्या गाण्यांनी बोअर तर झाले नाहीतच उलट

मलाच त्यांनी सुनावलं, 'अहो वाणी, असं काय करता! त्यांच्या गाण्यातील शब्दांना फार महत्त्व आहे. हे शब्द पुढे लोप पावतील. हे लोकधन तुम्ही जपून ठेवायला हवे. शक्य तितक्या लवकर तुम्ही त्यांची गाणी ध्वनिमुद्रित करून ठेवा.' माझ्या आईची गाणी हा एक मोठा समृद्ध ठेवा आहे ह्याची मला पु.लं.नी जाणीव करून दिली. त्यांच्या सांगण्याप्रमाणे मी आईची सर्व गाणी ध्वनिमुद्रित करून ठेवली.

पु.ल. पाहुणे म्हणून आले पण घरातलेच होऊन गेले. एकदा असेच आम्ही बाहेरुन आलो. घरी कमलिनीने खिचडी करून ठेवली होती. हसतखेळत जेवणं झाली, खिचडी जवळ जवळ संपली. कमलिनी ते पातेलं धुण्यासाठी उचलणार, तेव्हढ्यात पु.लं.नी ते मागून घेतलं आणि खाली असलेली खरवड चाटून पुसून खाऊन टाकली आणि म्हणाले, 'मला फार आवडते खरवड.' सुदाम्याचे पोहे श्रीकृष्णाने आवडीने खाल्ल्यावर सुदाम्याला किती कृतकृत्य वाटलं असेल ते मला त्या दिवशी समजलं.

पु.लं.नी जी तत्त्वं जपली, त्याच्या विरुद्ध कोणी बोललं किंवा काही घडलं की ते कसे नाराज व्हायचे हे ही आम्ही अनुभवलं. गाडीतून जात असताना पु.ल. माझ्या शेजारी बसायचे. गाडीत माझ्याकडे ३२ कॅसेटसनी भरलेली एक पेटी होती. पु.लं.नी त्यांच्या पसंतीची लावलेली कॅसेट ऐकत गप्पा मारत आमचा प्रवास चालायचा. एकदा 'शुक्रतारा'ची कॅसेट त्यांनी निवडली. पण ती अस्सल कॅसेट नसून बनावट कॉपी आहे हे लक्षात आल्यावर पु.ल. रागावले. अशी अनधिकृतपणे कॉपी करणे हे चूक आहे अशा अर्थाचं काहीतरी ते चिडून बोलले. आम्ही सगळेच गप्प झालो. थोड्या वेळाने त्यांनीच पुन्हा संभाषणाला सुरुवात करुन वातावरण पूर्ववत केलं. पण या प्रसंगावरून सर्वच कलाकारांविषयी त्यांना किती कळकळ होती, त्यांच्या हक्कांबाबत ते किती जागरूक होते याचा प्रत्यय आला.

असाच दुसरा प्रसंग म्हणजे एकदा अशीच गप्पांची मैफल जमली असताना एक बाई तावातावाने मुंबईविषयी बोलू लागल्या. 'हे परप्रांतातून लोंढे येतात, रस्त्यावर राहतात. यांच्यामुळे मुंबईचं वाटोळं झालंय, सगळी शान गेली आहे. ह्या फुटपाथवरच्या लोकांना हाकलून दिलं पाहिजे.' वगैरे वगैरे. पु.लं.ना ते सहन झालं नाही, ते लगेच म्हणाले, 'का? ती माणसं नाहीत? त्यांना जगण्याचा हक्क नाही?' त्यांच्या उत्तुंग व्यक्तिमत्वाला माणुसकीच्या अस्तराने कसं अधिकच संपन्न केलं आहे याची जाणीव या प्रसंगावरून झाली.

कॅलगरीत असतांना पु.लं. चा एखादा जाहीर कार्यक्रम व्हावा अशी समस्त मराठी मंडळींची इच्छा होती. एडमंटन (३०० कि.मी.), सास्काटून (७०० कि.मी.), रिजायना (६०० कि.मी.) अशा जवळपासच्या शहरातील मराठी मंडळींचीही तशी मागणी होती. पु.लं.नी 'वाऱ्यावरची वरात' किंवा 'असा मी असामी' मधलं काहीतरी सादर करावं अशी सर्वांची इच्छा होती. पण त्यांना मात्र सुनीताबाईंच्या सहभागाने कविवर्य बोरकरांच्या कविता सादर करायच्या होत्या. कार्यक्रमाचं सादरीकरण अगदी उत्तम रीतीने व्हायला हवं यावर सुनीताबाईंचा कटाक्ष होता. त्यामुळे कार्यक्रमाच्या आधीच्या काळात आम्ही कोणाकडेही गेलो की सुनीताबाईंची सौंदर्यशोधक नजर तिथल्या सुंदर झाडांच्या कुंड्या टिपायची आणि त्या हळूच मला विचारायच्या, 'ही झाडं आपल्या कार्यक्रमाच्या दिवशी सजावटीसाठी मिळतील का?' उत्तर अर्थातच होकारार्थी मिळायचे. कार्यक्रमाच्या वेळी ह्या अनेक सुंदर झाडांनी रंगमंच खूपच सुशोभित दिसत होता. पु.लं.नी आधीच सांगून टाकलं, 'कार्यक्रम चालू असतांना फोटोचे फ्लॅश उडवायचे नाहीत. नंतर मी तुम्हाला खास फोटोसाठी पोझेस देईन.' पु.ल. आणि सुनीताबाईंनी सादर केलेल्या 'आनंदयात्री बोरकर' यांच्या कविता आजही कानात घुमत आहेत. माझी आईसुद्धा कार्यक्रमाला आली होती. कार्यक्रमानंतर सुनीताबाईंनी आईकडे खास चौकशी करून कार्यक्रम आवडला का आणि त्यातल्या कोणत्या कविता विशेष आवडल्या अशी तिच्याकडे विचारणा केली.

सुनीताबाई आणि पु. ल. हे एक विलक्षण जोडपं होतं. पु. ल. म्हणजे दोस्तांच्या गोतावळ्यात रमणारे, गप्पांमध्ये वेळकाळाचं भान विसरणारे, शिस्तीची चौकट फारशी न मानवणारे, कलेच्या परमानंदात व्यवहाराला लुडबुडू न देणारे आणि सुनीताबाई म्हणजे स्वतः उत्तम कलाकार आणि कलोपासक असूनही अष्टावधानी असणाऱ्या, अत्यंत नीटनेटक्या, स्वच्छताप्रिय, शिस्तबद्ध दैनंदिनी असणाऱ्या. सर्वात महत्त्वाचं म्हणजे क्वचित प्रसंगी स्वतः वाईटपणा घेऊन आर्थिक व्यवहार चोख सांभाळणाऱ्या - ज्याचा पु.लं ना मनस्वी कंटाळा होता.

ते उभयता कॅलगरीला आमच्याकडे असताना मराठी प्रतिष्ठान स्थापन करण्याविषयी आमचं बोलणं चाललं होतं. पु.लं.ना ती कल्पना फारच पसंत पडली होती, त्यामुळे ते उत्साहाने सूचना करत होते. प्रतिष्ठान स्थापायचे म्हणजे आयकर खात्याच्या जाचक अटी पाळायची बंधनं आलीच. पु.ल. देशपांडे फाऊंडेशनच्या कार्यादरम्यान आलेल्या अनुभवाचा मला उपयोग व्हावा या हेतूने सुनीताबाईंनी विविध करांसंबधीच्या नियमाबाबत चर्चा करायला सुरुवात केली. खरं तर ही बाजू सांभाळणं आवश्यकच होतं. पण पु.लं. मधला सृजनशील कलाकार ह्या नीरस चर्चेला कंटाळला. ते काहीसे वैतागून म्हणाले, 'सुनीता, तू हेच बोलत राहणार असशील तर मी वर जाऊन झोपतोच कसा!'

पु.लं.चं वैतागणं मी समजू शकतो. परंतु सृजनशीलता आणि चोख व्यावहारिकता यांची सुनीताबाईंनी योग्य सांगड घातल्यामुळेच पु.लं.च्या दातृत्वाला बहर आला आणि मुक्तांगण सारख्या अनेक संस्थांना त्यामुळे भरघोस देणग्या मिळाल्या हे निर्विवाद.

पण हेच पु.ल., जेव्हा एखाद्या गोष्टीत रस घ्यायचे तेव्हा किती मनापासून त्यात लक्ष घालायचे तेही मी अनुभवलं. आठवडाभरातील मुक्कामात पु.लं.शी बऱ्याच विषयावर चर्चा झाल्या. त्यात का.स. वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्था सुरू करण्यासंबंधीचा प्रस्ताव महत्त्वाचा होता. मी मराठीच्या संवर्धनासाठी संस्था काढणार, हे ऐकून त्यांना खूप बरं वाटलं. त्यानंतर भारतात गेलो असताना संस्थेची भूमिका ठरविण्यासाठी संस्थेचे नियोजित संचालक डॉ. रमेश वरखेडे यांना मी मुद्दाम पु.लं. ना भेटायला घेऊन गेलो. आदल्याच दिवशी त्यांना कालिदास पुरस्कार मिळाला होता. त्यांच्या अनेक चाहत्यांची त्यांना भेटायला गर्दी होणार, अशावेळी ते आपल्याला चर्चेसाठी फारसा वेळ देणार नाहीत असे आम्ही गृहीतच धरलं होतं. परंतु पु.ल. त्या दिवशी आमच्याशी फारच आत्मियतेने सविस्तर बोलले. तास दीड तास चर्चा चालली. अभिनंदनासाठी येणाऱ्या दूरध्वनींचा खणखणाट सुरू झाला आणि चर्चेत व्यत्यय येऊ लागला. अभिनंदनासाठी येणाऱ्या दूरध्वनीपेक्षा पु.लं.ना मराठीच्या विकासासाठी चाललेली चर्चा महत्त्वाची वाटली. म्हणून दुसऱ्या वेळी दूरध्वनीची घंटा वाजताक्षणी त्यांनी त्याची पीनच काढून ठेवली. त्यांच्या या मन:पूर्वकतेने आम्ही खूपच भारावून गेलो. खूप मोठी उमेद त्यामुळे आम्हाला मिळाली.

पु.लं.च्या माझ्या घरच्या वास्तव्यात आमच्या खूपच तारा जुळल्या, अनेक वैयक्तिक विषयांवरही ते माझ्याशी मोकळेपणाने बोलले. ते डॉक्टरेट पदवी संपादन करू शकले असते पण तसं झालं नाही येथपासून त्यांच्या पार्ल्याच्या जुन्या घराच्या आठवणी असे सगळे विषय त्यांच्या चर्चेत यायचे. मी त्यावेळी संगीताला वाहिलेल्या 'बांसरी' नावाच्या नियतकालिकाचं संपादन करीत असे. त्याचे काही अंक मी त्यांना दाखविले. ते त्यांना अतिशय आवडले. तेव्हा NCPA चे ते डायरेक्टर होते. बासरी नियतकालिक मी NCPA ला पाठवायचं आणि NCPA चं जर्नल त्यांनी मला पाठवायचं असं छान साटं लोटं त्यांनी सुरू केलं. पु.लं.च्या आगमनानंतर काही आठवड्यांनी महाराष्ट्रातील एक प्रख्यात साहित्यिक पुढारी आमच्याकडे मुक्कामाला होते. त्यांनाही मी सहज 'बांसरी' विषयी बोललो. 'बांसरी' चा एकही अंक न बघताच त्यांनी शेरा मारला, 'इकडे कुणीही आणि काहीही फालतू गोष्टीही छापतात.' त्यांच्या या शेऱ्याने मी खूपच वरमलो. त्यावेळी पु.लं.च्या गुणग्राहकतेची मला प्रकर्षाने आठवण झाली.



कोलंबिया आइसफिल्ड पाहायला
निर्मला ठाकूर, सुनीता देशपांडे, जगन्नाथ वाणी आणि पु.ल. देशपांडे

पु.लं.च्या निवडक फोटोंचा अंतर्भाव असलेलं 'चित्रमय स्वगत' हे पुस्तक प्रसिद्ध झाल्यानंतर मला माझा मित्र सुधीर सवूर याचा फोन आला. तो म्हणाला 'अरे जगन, पु.लं. बरोबरचा तुझा एक फोटो छापून आलाय.' तो फोटो पहायची मला खूपच उत्सुकता होती. सुधीरने त्याची कॉपी मला पाठवली. माझा हिवाळ्यात वापरायचा तांबडा कोट आणि मखमलीची टोपी पु.लं.ना खूपच आवडायची. कुठेही बाहेर जाताना तो कोट आणि ती टोपी घालूनच ते बाहेर निघत. फोटोमध्ये त्यांच्या अंगावर तो कोट आणि डोक्यावर ती टोपी होती. (तो कोट आणि ती टोपी हे मी अजूनही जपून ठेवले आहेत. पु.लं.नी वापरल्यामुळे त्या दोन्ही वस्तू अमूल्य झाल्या आहेत.) कोलंबिया आईसफिल्ड हा अतिप्रचंड हिमनग पहायला मी पु.ल., सुनीताबाई, डॉ. आणि सौ. ठाकूर यांना घेऊन गेलो होतो. तेव्हा डॉ. ठाकुरांनी हा फोटो काढला होता. तो फोटो पु.लं.नी 'चित्रमय स्वगतात' अंतर्भूत केला होता. फोटोखाली लिहिलं होतं 'कॅनडामध्ये कॅलगरीचे आमचे स्नेही प्रा. वाणी यांच्या समवेत हिमनद पाहायला गेलो असताना'. पु.लं. नी दिलेली 'स्नेही' ही उपाधी मला पद्मश्री, पद्मविभूषण पेक्षाही मोलाची वाटते.

# आकांक्षापुढती जिथे गगन ठेंगणे ।

जगन्नाथ वाणी

उत्तर अमरिकेतील मराठी भाषिक मंडळींनी नव्या देशात मराठी भाषा आणि संस्कृतीशी असलेले आपले नाते जपून ठेवण्यासाठी अनेक शहरांत मराठी मंडळे स्थापन केली. १९८१ मध्ये ह्या सगळ्या स्थानिक मंडळांची बृहन्महाराष्ट्र मंडळ ऑफ नॉर्थ अमेरिका (बीएमएम) या नावाने एक मध्यवर्ती संस्था स्थापन झाली. यानंतर लगेचच बीएमएमने उत्तर अमेरिकेतील मराठी भाषिक अनिवासी भारतीयांचे द्वैवार्षिक अधिवेशन आयोजित करायला सुरुवात केली. ह्या अधिवेशनांमुळे उत्तर अमेरिकेतील मराठी कलाकारांना नाटके, गाणी आणि नृत्य सादर करण्यासाठी व्यासपीठ मिळाले. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे तरुणपणातील आपल्या आठवणींना उजाळा देण्यासाठी ह्या अधिवेशनांनी स्थलांतरितांसाठी एक चांगली सोय करून दिली. उद्घाटन आणि समाप्तीचे भव्य सोहळे त्याचप्रमाणे भारतातल्या प्रसिद्ध कलाकारांचे मनोरंजनाचे कार्यक्रम ही ह्या अधिवेशनाची मुख्य आकर्षणे असतात.

बीएमएमच्या पहिल्या नऊ अधिवेशनांमध्ये प्राध्यापक, अभिनेता, लेखक, राजकारणी, पत्रकार अशा प्रसिद्ध व्यक्तींना प्रमुख पाहुणे म्हणून निमंत्रित केले जाई. पण महाराष्ट्रातील एखाद्या नि:स्वार्थी समाजसेवकाला प्रमुख पाहुणा किंवा प्रमुख वक्ता म्हणून बोलावण्याचा विचार कोणत्याही अधिवेशनात झालेला नव्हता. असा विचार व्हावा यासाठी मी प्रयत्न करायचे ठरविले. अधिवेशनाच्या व्यवस्थापनात स्वत: सहभागी होऊन आणि अधिवेशन समन्वयकाची जबाबदारी अंगावर घेऊनच हे होऊ शकणार होते. त्यासाठी १९९९च्या प्रारंभी, सॅन होजेच्या अधिवेशनच्या काही महिने आधी, मी मैदानात उतरायचा धाडसी बेत आखला आणि २००१ साली होणाऱ्या अधिवेशनासाठी कॅलगरीचे निमंत्रण पाठवता येईल का याचा विचार करायला सुरुवात केली.

आजपर्यंतची सगळी अधिवेशने मराठी कुटुंबांची संख्या शेकड्यांत असणाऱ्या मोठ्या शहरांत झाली होती. प्रत्येक अधिवेशनासाठी निदान एकवीसच्या जवळपास स्थानिक समित्या स्थापन कराव्या लागतात. प्रत्येक समितीत कमीतकमी तीन सभासद घ्यायचे ठरविले तरी आम्हाला स्वेच्छेने कामास तयार असणारे ६३ हून जास्त समिती सभासद आवश्यक होते. कॅलगरीत फक्त पंचेचाळीस मराठी कुटुंबे होती. त्या पंचेचाळीस कुटुंबांतील नव्वद प्रौढ व्यक्तींपैकी सगळेच स्वेच्छेने ह्या समित्यांवर काम करावयास तयार होतील अशी खात्री देणे शक्य नव्हते. एखाद् दुसऱ्या कुटुंबाचा अपवाद वगळता कॅलगरीतील कोणतेही कुटुंब यापूर्वी बीएमएमच्या अधिवेशनाला उपस्थितही राहिले नव्हते. अशी पार्श्वभूमी असताना २००१च्या अधिवेशनासाठी कॅलगरीचे निमंत्रण पाठवण्याच्या माझ्या धाडसी कल्पनेला स्थानिक मराठी मंडळ प्रतिसाद देण्याची शक्यता अगदीच धूसर होती. परंतु ही धाडसी मोहीम राबविण्याच्या माझ्या सामर्थ्यावर मंडळाच्या त्या वेळच्या अध्यक्षा डॉ.नंदिनी सिंग ह्यांचा विश्वास होता. त्यांनी आणि त्यांच्या कार्यकारिणीच्या सभासदांनी माझी कल्पना आनंदाने मान्य केली आणि अधिवेशनासाठी कॅलगरीचे निमंत्रण तयार करण्याचे आणि ते सादर करण्याचे सर्व अधिकार माझ्याकडे सुपूर्द केले.

१९९९ साली सॅन होजे येथे झालेल्या अधिवेशनातील झगमगाट आजवरच्या इतर कुठल्याही अधिवेशनात बघायला मिळाला नाही. ह्या अधिवेशनातील सर्वात मुख्य आकर्षण होते ते म्हणजे प्रसिद्धीचे वलय असलेल्या पार्श्वगायिका आशा भोसले आणि दुसरे आकर्षण होते त्या वेळची सर्वाधिक प्रसिद्ध बॉलीवूड अभिनेत्री माधुरी दीक्षित. ह्या झगमगत्या आकर्षणात भर म्हणून तेथील स्थानिक कलाकारांनी सादर केलेले अनेक अप्रतिम सांस्कृतिक कार्यक्रम ! तेथे खर्चावर कोणतीही मर्यादा नव्हती; सिलीकॉन व्हॅलीचे चार पाच मराठी करोडपती अधिवेशन सर्वाधिक झगमगीत करायला हजारो डॉलर्सच्या देणग्या देण्यासाठी एकमेकांशी चढाओढ करीत होते.

एकूण वातावरण इतके दिपवून टाकणारे होते की पुढच्या अधिवेशनासाठी निमंत्रण देण्याची कोणत्याही शहराने हिम्मत केली नाही. कॅलगरीचे निमंत्रण देताना ‘ मी खूपच अस्वस्थ होतो ’ हे विधानसुध्दा खऱ्या वास्तवाची जाणीव करून द्यायला अपुरेच आहे. आमच्याकडे ना तर कुटुंबांची पुरेशी संख्या होती ना तर एवढ्या मोठ्या खर्चाला हातभार लावणारे लक्षाधीश ! निमंत्रण देणाऱ्या मंडळाच्या सभासदांचा एक जथाच निमंत्रण देण्याच्या वेळी हजर असतो. इथे माझ्या मदतीला आमच्या मंडळाचा कोणीही सभासद उपस्थित नव्हता. ही सगळी विरोधात्मक पार्श्वभूमी असूनही मोठे धाडस करून कॅलगरीचे निमंत्रण मी बीएमएमकडे सादर केले. ‘कॅलगरीत अधिवेशनासाठी सुसज्ज सभागृह (कन्व्हेनशन सेंटर) असेल का ? अधिवेशनासाठी येणाऱ्या प्रतिनिधींसाठी निरनिराळ्या हॉटेल्समध्ये पुरेशा खोल्या उपलब्ध होतील का ?’ ह्या आणि अशा सारख्या अनेक शंकांचे निरसन करण्याची मी तयारी ठेवली होती. अधिवेशनासाठी कॅलगरीत नव्यानेच बांधलेले अधिवेशन सभागृह आरक्षित केल्याचे हमी पत्र आणि अधिवेशनादरम्यान तीन रात्रींसाठी अगदी माफक दरात एकूण १,०५० खोल्या उपलब्ध करून देण्यात येतील अशी अर्धा डझन होटेल्सकडून आलेली पत्रे मी बरोबर घेऊन गेलो होतो. ‘ विमान प्रवासाच्या दृष्टिकोनातून कॅलगरी सोयीचे आहे

का ? ' या त्यांच्या प्रश्नाचे मला मुळीच आश्चर्य वाटले नाही. विमान प्रवासाच्या दृष्टिकोनातून अमेरिकेतील बहुतेक मोठी शहरे कॅलगरीशी जोडलेली आहेत हे मी त्यांच्या निदर्शनास आणून दिले. ' जगातील सर्वात मोठा मैदानी खेळ '( दि ग्रेटेस्ट आऊटडोअर शो ऑन अर्थ ) म्हणून ओळखली जाणारी जगप्रसिद्ध स्टॅम्पीडबद्दलची आणि भव्य कॅनेडियन रॉकीज्‌बद्दलची माहितीपत्रकेही प्रस्तावासोबत समाविष्ट करायला मी विसरलो नव्हतो.

बीएमएमच्या कार्यकारिणीच्या निदान दोन सभासदांना मी उत्तर अमेरिकेत करीत असलेल्या भारतीय संगीत आणि नृत्याच्या प्रसाराची आणि महाराष्ट्र सेवा समितीच्या माध्यमातून भारतातील निराधारांच्या मदतीसाठी करीत असलेल्या समाजकार्याची माहिती होती. यशस्वीपणे आव्हाने पेलण्याबाबतच्या माझ्या क्षमतेबद्दल त्या दोघांनाही खात्री होती. अधिवेशनाच्या समारोपाच्या वेळी २००१च्या अधिवेशनासाठी कॅलगरीने दिलेल्या निमंत्रणाची त्यांनी घोषणा केली. कॅलगरीतील लहान मराठी समुदायामुळे अधिवेशन कसे पार पडेल ह्याची शंका व्यक्त करूनच अनेकांनी माझे अभिनंदन केले. एक मित्र ह्याला अपवाद होता. त्याला अजिबात कुठलीही शंका नव्हती. त्याने मला 'सोपा' उपाय सुचविला. '' तुम्हाला मोठ्या समुदायाची गरजच नाही, फक्त आणखी दहा 'जगन्नाथ वाणी' उभे करा आणि तुमचं काम होईल.'' संख्येपेक्षा दर्जा जास्त महत्त्वाचा असतो हेच त्याला सूचित करायचे होते. त्याचा 'सोपा' उपाय म्हणजे दहा वाहून घेतलेले कार्यक्षम कार्यकर्ते शोधून त्यांना कामाला लावणे !

जरी 'सोपा' नसला तरी हा उपाय अगदी योग्य होता. कॅलगरीच्या मराठी समुदायात असे दहा कार्यकर्ते सापडणे अशक्य होते. ह्यासाठी उत्तर अमेरिकेतील सर्व मराठी समाजात अशा कार्यकर्त्यांचा शोध घ्यावा लागणार होता. तसेच कॅलगरीतील महाराष्ट्राबाहेरच्या माझ्या इतर भारतीय मित्रमंडळींचीही मदत मला घ्यावी लागणार होती. कॅलगरीप्रमाणेच एडमंटन, सास्काटून व व्हँकुव्हर येथील मराठी मंडळांनी मदतीसाठी हात पुढे केले. यानंतर उत्तर अमेरिकाभरचे चांगले कार्यकर्ते शोधून अधिवेशनाच्या उपसमित्यांची रचना करण्यात आली. अधिवेशनाच्या एकवीस उपसमित्यांपैकी चौदांचे अध्यक्ष कॅलगरी बाहेरचे मराठी मित्र होते आणि तीनचे अध्यक्ष कॅलगरीतीलच परंतु मराठी समाजाबाहेरचे माझे भारतीय मित्र होते. उरलेल्यांपैकी फक्त चार उपसमित्यांचे अध्यक्ष कॅलगरीतील मराठी मंडळाचे सदस्य होते.

बीएमएमच्या अध्यक्षा शैला विद्वांस ह्यांना अधिवेशनासाठी एक अगदी चपखल बोधवाक्य मिळाले, 'आकांक्षांपुढति जिथे गगन ठेंगणे !' श्री. कृ. कोल्हटकरांनी किती सुंदर आणि उदात्त कल्पना या काव्यपंक्तीतून व्यक्त केली आहे ! कॅलगरीतील अगदी लहान मराठी समुदाय आणि त्या लहानशा समुदायात अधिवेशनाच्या खर्चाची जबाबदारी घेणारा कोणी लक्षाधीश उपलब्ध नसताना अधिवेशनाबद्दलच्या आमच्या महत्त्वाकांक्षांपुढे गगन खरोखरच ठेंगणे होते ! माझ्या दृष्टीने अधिवेशनाची पार्श्वभूमी व्यक्त करणारे ह्याहून दुसरे चांगले बोधवाक्य मिळणेच शक्य नव्हते. शैलाने चिकाटीने आणि नेटाने पिच्छा पुरविल्यामुळे मीना नेरूरकरने आमच्या स्वागत समारंभातील 'सह्याद्रीचे स्वगत'ह्या कार्यक्रमाची जबाबदारी घेतली. शैलाबरोबर काम करणे हा एक आनंददायक अनुभव होता. अधिवेशनाच्या यशामध्ये तिचा सिंहाचा वाटा होता. खरे सांगायचे तर तिच्या नेतृत्वामुळेच आमचे 'आकांक्षापुढति जिथे गगन ठेंगणे !' हे बोधवाक्य सार्थ करता आले.

कॅलगरीतील विनय दत्तानी मराठी मंडळाचा सभासद नव्हता. त्याची मातृभाषा आहे गुजराथी. व्यवसायाने अभियंता असलेला विनय ध्वनिचित्रणातही तज्ज्ञ आहे. आमच्या ध्वनिचित्र समितीचे अध्यक्षपद स्वीकारून मला मदत करण्याची मी त्याला विनंती केली. आमच्या वैयक्तिक संबंधांमुळे त्याने ती आनंदाने स्वीकारली आणि तो आमच्या महत्त्वाच्या स्वयंसेवक मंडळात मनापासून सहभागी झाला. त्याच्या कुटुंबातील चार लोक आणि दोन मित्र असा स्वत:चा स्वयंसेवकांचा एक गट त्याने आपल्या मदतीसाठी तयार केला. त्यांच्या मदतीमुळे अधिवेशनाचे जवळपास पन्नास हजार डॉलर्स वाचले. विनयसोबत सास्काटूनचा माझा मित्र सुनील चौबळ याने अधिवेशनातील सर्व प्रसंगांची छायाचित्रे काढण्याची जबाबदारी स्वीकारली.

२००१च्या बीएमएमच्या अधिवेशनाच्या आयोजनात सहभागी होण्यासाठी मी एडमंटनहून सुरेश गुर्जरला निमंत्रित केले. त्याने माझे निमंत्रण आनंदाने स्वीकारले. त्यामागची दोन कारणे त्याने मला सांगितली. एकतर एवढ्या मोठ्या कामात मला मदत करणे आणि दुसरे म्हणजे अमेरिकेतील मराठी लोकांना निसर्गरम्य अल्बर्टाचे दर्शन घडविणे. बीएमएम अधिवेशनाचा अंगभूत भाग असूनही अगदी स्वतंत्र असलेल्या व्यावसायिक परिषदेच्या (बिझिनेस कॉन्फरन्सच्या) आयोजनाची संपूर्ण जबाबदारी सुरेशने आपणहून स्वीकारली आणि स्वतंत्रपणे काम करून एक अतिशय यशस्वी व्यावसायिक परिषद घडवून आणली.

बीएमएमच्या अधिवेशनात स्वयंसेवकांची जुळवाजुळव करणे आणि त्यांना व्यवस्थित सांभाळून घेणे हे फार महत्त्वाचे काम असते. त्या कामासाठी कार्यक्षम आणि स्वखुशीने काम करणारी व्यक्ती शोधणे हे एक मोठे आव्हानच होते. माझ्या डोळ्यासमोर पहिलं नाव आले ते शेरी गुर्जरचे. तिला स्वत:ला मराठी बोलता येत नाही पण मराठी बोलणाऱ्या सुरेश गुर्जरशी तिने लग्न केले आहे. कॅनडाच्या गर्ल गाईड्‌समधील तिचा सहभाग आणि त्या संस्थेसाठी स्वयंसेवकांच्या समन्वयाच्या तिने केलेल्या कौशल्यपूर्ण कामाबद्दल मला माहिती

होती. मी जरा चाचरतच तिला माझ्या बीएमएम अधिवेशनाच्या मोहिमेत मदत करण्याबद्दल विचारले. तिने आनंदाने होकार दिल्यावर मला आश्चर्याचा सुखद धक्काच बसला. शेरीने कॅलगरी आणि एडमंटनमधून अनेक स्वयंसेवक गोळा केले. बहुतेक स्वयंसेवक मराठी समुदायाबाहेरचे होते. अधिवेशनाचे तीन दिवस शेरीच्या सहनशीलतेची परीक्षा बघणारे होते. कार्यवाही समित्यांनी आयत्या वेळी केलेली स्वयंसेवकांची मागणी अतिशय तणावपूर्व परिस्थितीतही तिने सस्मित चेहऱ्याने व शांत चित्ताने पूर्ण केली.

शेवटच्या दिवशी दुपारच्या जेवणाच्या वेळी शेरी आणि विनयने अधिवेशनातील प्रतिनिधींच्या आयत्या वेळच्या उत्स्फूर्त मुलाखतींची कल्पना काढली. अशा मुलाखतीतून अधिवेशनासाठी आलेल्या प्रतिनिधींच्या खऱ्याखुऱ्या प्रतिक्रिया व्यक्त होणार होत्या. विनयने कॅमेरामन बनून आणि शेरीने मुलाखतकार बनून डझनाहून अधिक प्रतिनिधींच्या मुलाखती कॅमेऱ्यात पकडल्या. अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशीच्या कार्यक्रमादरम्यान विनयने ह्या मुलाखती मोठ्या पडद्यावर चित्रित केल्या. मुलाखतींचे इतके जलद प्रसारण बघून प्रेक्षकही खूपच प्रभावित झाले. प्रेक्षकांना एकूण कल्पना फारच आवडली. विनय आणि शेरी दोघांवर कौतुकाचा वर्षाव झाला. बीएमएमच्या कोणत्याच अधिवेशनात अशा उत्स्फूर्त मुलाखतींचे सादरीकरण मी पाहिले नाही.



बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या अधिवेशनप्रसंगी
रुबेन नेल्सन, सुरेश गुर्जर, मुरली पेंढारकर, सुधीर परब, मनोहर जोशी, क्लिंट डन्फर्ड, विजय भटकर, अभय बंग, शैला विद्वांस आणि जगन्नाथ वाणी

माझी सून प्रतिमा कोणतेही हाती घेतलेले काम अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने पार पाडते. कोणतीही गोष्ट सुव्यवस्थित झाल्याशिवाय तिचे समाधान होत नाही. साहजिकच अधिवेशनाच्या आयोजनात तिने सहभागी व्हावे अशी माझी इच्छा होती. अधिवेशनात जवळजवळ ३५% उपस्थिती ही १८ ते ३५ वयोगटाच्या तरुणांची असते. तरुणांच्या या गटाचे तिने सुकाणू समितीत प्रतिनिधित्व करावे ही माझी सूचना तिने आनंदाने मान्य केली. नंतर सुकाणू समितीचे चिटणीस पदही तिने स्विकारले. वेळच्या वेळी इतिवृत्त लिहिण्याचे आणि तत्परतेने ते वितरण करण्याचे काम तिने उत्तम प्रकारे केले. बैठकीत चर्चेला आलेल्या सर्व मुद्द्यांचा अचूक गोषवारा तिच्या इतिवृत्तातून प्रतीत होत असे. समितीच्या सगळ्या बैठकीत सहभागी होऊन तिने समितीच्या नियोजन आणि आखणीवर आपला स्वत:चा असा ठसा उमटवला. स्टॅम्पीडचा खास नाष्टा, रात्रीचे भोजन आणि नृत्य ह्या सारख्या तरुणांच्या अनेक कार्यक्रमांमध्ये आयत्या वेळी आणखी उमेदवार घेणे बरेच त्रासाचे असते. तरीही अशा ऐनवेळी आलेल्या उमेदवारांना तिने कुठल्याही प्रकारे त्रागा न करता सामावून घेतले. नंतर येणाऱ्या या उमेदवारांना अन्यथा ह्या मर्यादित प्रवेशांच्या कार्यक्रमात सहभागी होता आले नसते. माझा मुलगा राजूही प्रतिमाबरोबर तरुणांच्या समितीमध्ये होता. परंतु त्याचा प्रमुख सहभाग होता व्यावसायिक

परिषदेच्या समितीत. भारताच्या सुपर संगणकाचे जनक डॉ. विजय भटकर ह्यांनी मला पाठवलेल्या ई-मेल मध्ये खास करून व्यावसायिक परिषदेमध्ये राजूने त्याच्या सादरीकरणाद्वारे जो ठसा उमटवला त्याचा विशेष उल्लेख केला.

व्यासपीठ आणि सजावट समितीचा प्रमुख फ्लोरिडाचा किशोर पाठारे माझ्या समर्पित कार्यक्षम स्वयंसेवकांच्या गटामध्ये होता. त्याने त्याच्या मदतीसाठी स्वत:चा एक गट तयार केला होता. त्यामध्ये त्याचा मुलगा विदेश, मुलगी आसावरी गुप्ते आणि मेरी किलगोर व स्टीव्ह जॉर्ज या दोन सहकाऱ्यांचा समावेश होता. व्यासपीठावरील सगळ्या कार्यक्रमांच्या पार्श्वभूमीसाठी उत्तम सजावट तयार करण्यासाठी त्याने घेतलेल्या कष्टांची कोणी कल्पनाच करू शकत नाही. अधिवेशनाच्या तीन दिवसांदरम्यान त्याच्या मदतीसाठी आम्ही त्याला आणखी तीन स्थानिक स्वयंसेवक दिले. शरद मोकाशी त्यापैकी एक होता. किशोरला नाटकासाठी व्यासपीठावर काही फर्निचर हवे होते. ते अगदी माफक दरात मिळवून द्यायला शरदने मदत केली. ६५ डॉलर्सची लहानशी देणगी देऊन त्याने ते कॅलगरी इंटर-फेथ स्टोअरमधून फर्निचर उसनवार आणले.

भारतातील प्रख्यात शास्त्रीय संगीतकारांच्या सुजन राणेंच्या कुंचल्यातून उतरलेल्या तैलचित्रांचे प्रदर्शन हे अधिवेशनातील आणखी एक आकर्षण होते. ह्या प्रख्यात कलाकारांच्या चेहऱ्यावरील भाव राणेंनी खूप बारकाव्याने टिपले होते. मिळालेल्या संधीबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना राणे म्हणाले, 'अधिवेशनातील माझ्या चित्रांच्या प्रदर्शनाची संधी ही माझ्याबरोबर नेण्यासाठी एक सुखद स्मृतीच आहे.'



बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या अधिवेशनातील भाषणप्रसंगी
डॉ. नितू मांडके आणि डॉ. अभय बंग

सॅन होजेच्या माझ्या एका मित्राने तेथील अधिवेशनाच्या त्याच्या अनुभवावरून आम्हाला 'काय करावे आणि काय करू नये' ह्याची एक यादीच माझ्याकडे पाठवली होती. त्या अधिवेशनातील लहान मुलांना सांभाळण्याच्या पाळणाघराच्या सोयींशी निगडित काही समस्या त्याने प्रकर्षाने आमच्या निदर्शनास आणल्या होत्या. पाळणाघर समितीची प्रमुख आरती कारखानीसने शालिनी मोकाशींची मदत घेऊन माझ्या मित्राच्या सल्ल्याची व्यवस्थित अंमलबजावणी केली. आरतीच्या उत्तम आयोजनामुळे सगळी मुले आणि त्यांचे पालक खुश होते. अधिवेशनाच्या मुख्य कार्यक्रमाचा आस्वाद घेऊन जेव्हा पालक मुलांना न्यायला आले तेव्हा मुले त्यांच्याकडे परत यायलाच तयार नव्हती. दोन पेक्षा अधिक कुटुंबांकडून आम्हाला ही प्रतिक्रिया ऐकायला मिळाली. एका कुटुंबाने आधीच्या अधिवेशनातील अनुभवही सांगितला. तेथे पाळणाघरात कंटाळून गेलेली मुले पालकांच्या येण्याची आतुरतेची वाट पहात असत. दिवसभरातील मुलांच्या कार्यक्रमाचा दर्जा, त्यातील विविधता आणि शैक्षणिक उपयुक्तता याबाबत पाळणाघराच्या सोयीचा लाभ घेणाऱ्या सर्व पालकांच्या प्रतिक्रिया सकारात्मकच होत्या.

बीएमएम अधिवेशनात कन्टीन्युईंग मेडिकल एज्युकेशन हा एक स्वतंत्र कार्यक्रम असतो. पेंटीक्टन (ब्रिटिश कोलंबिया) येथील डॉ. विलास प्रभू ह्यांनी ह्या कामाची सर्व जबाबदारी स्वीकारली होती. कॅलगरीतील एल्कन् चरीकर, सुनंदा मणेरीकर आणि मयुरा रंगायन ह्यांनी अनुक्रमे सुविधा, भोजन आणि प्रदर्शन समितीची सूत्रे सांभाळली. टोरोंटोच्या विनायक गोखले यांनी अधिवेशनाच्या स्मरणिकेच्या प्रकाशनाची जबाबदारी घेतली. बॉस्टनचे सुधाकर वेलंकीवार नाट्य आणि कला समितीचे प्रमुख होते. अधिवेशनात एकाच वेळी चार भिन्न सभागृहांमध्ये होणाऱ्या कार्यक्रमांसाठी वेगवेगळ्या गटांची निवड करण्याचे काम त्यांनी पाहिले. परंतु त्यांना अधिवेशनाला उपस्थित राहता आले नाही. सास्काटूनच्या प्रकाश सुलाखेने आयत्या वेळी ह्या कार्यक्रमांच्या सादरीकरणाचे काम पाहिले. न्यू जर्सीच्या सुनील पाटलांनी कार्यशाळा समितीचे काम स्वीकारून त्यासाठी योग्य विषय आणि व्यक्तींची निवड केली.

आधी नमूद केल्याप्रमाणे महाराष्ट्रातील समाज सेवकांना बीएमएमच्या अधिवेशनांना निमंत्रित करून त्यांच्या नि:स्वार्थी समाज कार्याला प्रसिद्धी देण्याची प्रथा सुरू करण्याचे माझे स्वप्न होते. प्रसिद्ध समाजसेवक डॉ. अभय बंग यांना कॅलगरीच्या अधिवेशनासाठी प्रमुख वक्ते म्हणून निमंत्रित करण्यात मी यशस्वी झाल्याने माझा हा उद्देश सफल झाला. 'सेवाग्राम ते शोधग्राम' ह्या त्यांच्या हृदयस्पर्शी व्याख्यानाने सर्व उपस्थित खूपच भारावून गेले. डॉक्टर्स, इंजिनियर्स किंवा तत्सम अनेक विद्याविभूषित व्यावसायिक व्याख्यानानंतर त्यांना वाकून नमस्कार करीत होते. बीएमएम अधिवेशनात समाजसेवकाच्या झालेल्या या पहिल्यावहिल्या यशस्वी व्याख्यानाचे प्रतिध्वनी अधिवेशनाच्या बाहेरही दूरवर उमटले. मुंबईच्या सर्वोदय मंडळाने हे व्याख्यान गुजराथी, हिंदी आणि इंग्रजी भाषांमध्ये पुस्तिकेच्या स्वरूपात प्रसिध्द केले. आजवरच्या कोणत्याही बीएमएम अधिवेशनातील वक्त्याच्या भाषणाचा इतका दूरगामी परिणाम झालेला नाही. अधिवेशनात समाजसेवकाला

निमंत्रित करण्याचा हा पहिलाच प्रयत्न इतका प्रभावी ठरला की पुढील सर्व अधिवेशनातून ही परंपरा चालू ठेवण्यात आली.

डॉ. अभय बंगांखेरीज भारताच्या सुपर संगणकाचे जनक डॉ. विजय भटकर, आपल्या हयातीतच दंतकथा बनून राहिलेले हृदयशल्यविशारद डॉ. नितू मांडके, 'उड्डाण पूल तज्ज्ञ' ('द फ्लायओव्हर मॅन') मा. नितीन गडकरी, आंतरराष्ट्रीय नाणे निधीचे (इंटरनॅशनल मोनेटरी फंडाचे) प्रशासकीय अध्यक्ष डॉ. विजय केळकर, भारताचे अवजड उद्योगधंद्यांचे मंत्री मा. मनोहर जोशी, अल्बर्टाचे वाणिज्य विस्तार मंत्री मा. मार्क नॉरिस आणि भविष्यवेत्ते रूबेन नेल्सन यांचाही अधिवेशनात समावेश होता.

अधिवेशनाच्या समारोपाचा कार्यक्रम महाराष्ट्राची लाडकी गायिका कै. माणिक दादरकर-वर्मा ह्यांच्या जीवनावर आधारित होता. संगीत कार्यक्रमांचे निर्माते मुंबईचे अशोक हांडे ह्यांनी हा मल्टीमिडीया कार्यक्रम सादर केला होता. अशोक हांडेंनी कार्यक्रमासाठी माणिकताईंच्या अतिशय हृदयस्पर्शी गाण्यांची निवड केली होती. त्यांनी लिहिलेल्या जबरदस्त कथानकाच्या निवेदनाचे काम माणिकताईंची मुलगी वंदना गुप्ते करीत होती. 'लाविते मी निरांजन...' ह्या कार्यक्रमाच्या समारोपातील गीताने प्रेक्षकांच्या मनाचा ठाव घेतला. कार्यक्रम संपल्यावर सगळ्यांच्या डोळ्यांतील अश्रू गालांवर ओघळत होते.

प्रत्येक अधिवेशनानंतर एकता त्रैमासिक अधिवेशनातील अनुकूल व प्रतिकूल गोष्टींवर प्रतिक्रिया देणारे लेख प्रकाशित करते. एकताच्या ऑक्टोबर २००१च्या अंकामध्ये कॅलगरीच्या अधिवेशनासंदर्भात पाच लेख छापून आले होते. पाचांपैकी कोणत्याही लेखात अधिवेशनासंदर्भात प्रतिकूल प्रतिक्रिया नव्हती. सहसा, काय चुकले आणि काय सुधारायला हवे ह्याबद्दल सूचना करणाऱ्या काही प्रतिक्रिया असतात. कॅलगरी अधिवेशन ह्याला अपवाद ठरले. त्याच अंकात कधी नव्हे ते पहिल्यांदाच अधिवेशनावर आधारित व्यंगचित्रांची मालिका पण छापली होती. ही सगळीच व्यंगचित्रे अधिवेशनाचे कौतुक करणारी होती. अधिवेशनासंबंधीच्या प्रतिक्रिया व्यक्त करणारे खालील दोन उतारे खूपच उद्बोधक आहेत.

"कॅलगरीचे अधिवेशन म्हणजे एक चमत्कारच म्हणावा लागेल. मी ऐकलं होतं की सगळा सावळा गोंधळ असेल कारण कॅलगरीतील मराठी समुदाय (आकाराने) खूपच लहान आहे. तुमच्या सहकार्याचा आणि विचारांतील समंजसपणाचा मी अनुभव घेतला होता, मला (कोणताही) गोंधळ अपेक्षित नव्हता परंतु तरीही मला फार जास्त अपेक्षाही नव्हती पण मला आश्चर्यच वाटलं, सगळं इतकं सुंदर आयोजित केलं होतं की मी एका वाक्यात त्याचं वर्णन करीन, 'सुबक, देखणे आणि आटोपशीर अधिवेशन !' "

स्मिता भागवत, टोरोंटो

"कॅलगरीची ' सुपारी ' घेऊन आलेल्या डॉ. जगन्नाथ वाणी ह्यांच्या कार्यक्षमतेची पूर्ण कल्पना असणाऱ्यांच्याही मनात अनेक प्रश्नचिन्हे दाटून आली होती. मग इतरांचे काय ? ... 'आकांक्षापुढति जिथे गगन ठेंगणे' हे दहाव्या अधिवेशनाचे सूत्र शिरोधार्य मानण्याची त्यांची जिद्द कॅलगरीला हजर असलेल्या प्रत्येकाला पावलोपावली नजरेला येत होती. 'कॅलगरीचं अधिवेशन कसलं पार पडतंय ?' ह्या शंकेपासून ते, 'कॅलगरीचं अधिवेशन रद्द होतं आहे बरं का !' अशा वावड्यांपर्यंतच्या सर्व विघ्नसंतोषी तऱ्हा अनुभवाला येत होत्या पण... तसे व्हायचे नव्हते !"

दुर्गा पाच्छापूरकर, टोरोंटो

ऑक्टोबर २००१ च्या एकताच्या त्रैमासिकात प्रसिध्द झालेली पुढील तीन व्यंगचित्रे खूपच बोलकी आहेत.








# संजय उपाध्ये यांचे गप्पाष्टक

हेमंत बेर्डे

साधरण मे २००५ च्या सुरवातीला व्हँकुव्हरच्या मराठी मंडळचा मला फोन आला. ‘ संजय उपाध्ये यांचा व्हँकुव्हरच्या मंडळात झालेला गप्पाष्टक कार्यक्रम खूपच लोकप्रिय झाला आणि त्यांच्या गप्पाष्टकासारख्या आणखी एका कार्यक्रमाची मंडळाच्या सदस्यांनी जोरदार मागणी केलेली आहे. हा लोकप्रिय कार्यक्रम कॅलगरी मराठी मंडळाला सादर करायचा असल्यास संजय उपाध्ये शनिवारी, ४ जूनला, कॅलगरीला येऊ शकतील.’ माझ्या कार्यकारी मंडळला कल्पना आवडली आणि मी आमचा होकार त्यांना कळविला.

हा कार्यक्रम खरोखरच प्रशंसनीय झाला. संपूर्ण श्रोतृवर्ग उपाध्ये यांच्या खुमासदार विनोदांनी मंत्रमुग्ध झाला होता. बहिणाबाई, कुसुमाग्रज यांच्या काही कवितांचे आणि स्वत: लिहिलेल्या काही कवितांचे त्यांनी वाचन केले. मराठी वाङ्मय, त्यावेळी चालू असलेल्या सामाजिक आणि राजकीय घडामोडी, धर्म इत्यादी विषयावर त्यांनी विस्तारीत टिप्पणी केली. उपाध्ये यांनी मराठी विनोदी साहित्यातील अत्रे, गदिमा, कोल्हटकर आदी लेखकांच्या विनोदी शैलीवर विस्तारीत विश्लेषण केले.

उपाध्ये यांनी दोन तासांच्या कार्यक्रमात साहित्य, कला, राजकारण, समाजकारण, नाटक, काव्य, संगीत, संस्कृती इत्यादी वेगवेगळ्या विषयांचा सुंदर गोफ गुंफून सर्व श्रोतृवर्गाला खुर्चीवर खिळवून ठेवले. त्यांच्या वेगवेगळ्या विषयातील अगाध ज्ञानाने श्रोते अचंबित झाले. श्री. उपाध्ये यांची संवादशैली सहज आणि ओघवती होती. त्यांचे स्वनिर्मित विनोद खुमासदार होते. त्यांनी केलेल्या विनोदांची तुलना पु.ल. देशपांडेंच्या विनोदाशी केली तर वावगे ठरणार नाही. दैनंदिन व्यवहारात घडणाऱ्या गोष्टी विनोद आणि नाट्याच्या स्वरूपात श्रोत्यापर्यंत पोहोचवण्याची एक अनोखी कला उपाध्ये यांच्याकडे आहे.

उपाध्ये हे एक आपल्या कलेच्या व्यवसायाला संपूर्णपणे वाहून घेतलेले गृहस्थ आहेत. त्यांना आपल्या कलेद्वारा समाजात काहीतरी चांगले व्हावे असे वाटते. त्या दृष्टीने त्यांनी आपल्या कार्यक्रमात समाजात दिसणाऱ्या सकारात्मक घटनांचाही समावेश करायला हवा. गप्पाष्टक कार्यक्रमाद्वारे भ्रष्टाचारावरील विनोदासमवेत त्यावरील उपायाच्या दिशा सुचवून काही विधायक संदेश समाजाला देता आला तर त्याचा समाजावर खूप दूरदर्शी आणि उपकारक परिणाम होईल. उपाध्ये यांनी कविवर्य ग.दि. माडगूळकर यांना आपले गुरु मानले आहे. त्यांच्या कार्यक्रमावर टिपण्णी करावयाची झाल्यास इतके सांगता येईल की, त्यांनी आपल्या गुरुची विद्या आत्मसात करून त्यांचे नाव सार्थ ठरविले आहे.

-------------------------------------

(पान ७ वरून)

शिवछत्रपतींच्या काळात, मराठीत शिरलेला फारसीपणा काढून तिला संस्कृतनीष्ठ रूप देण्यात आले. त्यासाठी राजव्यवहार कोश तयार केला गेला. पण पेशवेकाळापर्यंत याचा अतिरेक होऊन मराठीचे मराठीपणच जणू नष्ट होऊ लागले. संत एकनाथांच्या वचनाची इथे आठवण येते, ‘‘संस्कृत देवे निर्मिली, प्राकृत काय चोरापासूनी आली ?’’ हा संस्कृतचा अतिरेकही हळूहळू कमी झाला.

अर्वाचीन काळात किर्लोस्कर, देवल आणि गडकऱ्यांच्या मराठी नाटकांनी मराठीमध्ये पुन्हा जिवंतपणा आणला. केशवसुत, केशवकुमार (प्र. के. अत्रे), हरी नारायण आपटे, कुसुमाग्रज (वि. वा. शिरवाडकर), बा.सी. मर्ढेकर, विनोबा भावे, वि. स. खांडेकर, पु. ल. देशपांडे, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, स्वातंत्र्यवीर सावरकर, अरविंद गोखले, गंगाधर गाडगीळ, बा. भ. बोरकर, जी.ए. कुलकर्णी, बहिणाबाई, ना. धों. महानोर अशा असंख्य नाटककार कवी, कादंबरीकारांनी मराठीचे मराठीपण जपले.

या मराठीच्या थोडक्यात लिहिलेल्या इतिहासातून जर काही भविष्य वाचायचे झाले तर एवढे नक्की म्हणता येईल की, ‘‘प्रहार कितीही होवोत, संकटे कितीही येवोत, माझ्या माय मराठीची पुण्याई इतकी थोर आहे की, युग लोटली तरी मराठीची थोरवी थोडीही कमी होणार नाही,’’ कवी सुरेश भट यांच्या शब्दात लिहायचे म्हटले तर,

लाभले आम्हाला भाग्य बोलतो मराठी
जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी,
धर्म, पंथ, जात एक जाणतो मराठी
एवढ्या जगात माय मानतो मराठी
पाहुणे जरी असंख्य पोसते मराठी
आपल्या घरीच हाल सोसते मराठी
हे असेच कितीक खेळ पाहते मराठी
शेवटी मदांध तख्त फोडते मराठी

संदर्भ: Prabhakar Machawe, "Marathi: The Language and Its Linguistic Traditions', Indian & Foreign Review, March 1985

# सहल 'सिकोमी लेक' कडे ...

प्रीती देशपांडे

मी कॅलगरीला सुनेच्या बाळंतपणासाठी माझ्या मुलाकडे गेले होते. तेथे गेल्यावर बाळाला बघून मला खूप आनंद झाला आणि माझ्या मुलांचे बालपण आठवू लागले. माझ्या नातीच्या बाललीला बघण्यात तासन्तास जाऊ लागले. अशातच निरंजनने मला सांगितले की, आई, आपल्याला १० जुलैला 'सिकोमी लेक' या ठिकाणी आमच्या कॅलगरी मराठी मंडळाने काढलेल्या सहलीला जायचे आहे. मराठी मंडळाचे नाव ऐकून मला फार आनंद झाला आणि वाटले,

''परप्रांतीय भाषांची खेळा मधून-मधून होली ।
अजरामर मराठी असे आमुची मायबोली ।।''

परप्रांतात जाऊन त्यांचे चांगले गुण अवलोकन करावे पण आपल्या मातृभूमीचा व मातृभाषेचा बाणा मात्र सतत तेवत ठेवावा, हीच आपली खरी संस्कृती आणि परंपरा. यासाठी सर्व मराठी माणसांना एकत्र आणून अनेक करमणुकीचे कार्यक्रम आयोजित करण्याची खूपच गरज असते. कारण अनेकजण एकत्र बांधण्याचे व त्यांच्याशी भावनिक, आत्मिक, जवळीक, साधण्याचे काम हे कार्यक्रम करत असतात.

कॅलगरी मराठी मंडळाची स्थापना ही १९८५ साली करण्यात आली. मंडळाला एक बलाढ्य रूपरंग देण्याच्या कामाचे शिवधनुष्य २०१० साली जयंत तोरणे, नितीन बोरसे व निरंजन देशपांडे या तिघांनी समर्थपणे पेलले आहे. त्यामध्ये अनेक सुधारणा केल्या, नवनवीन गोष्टी आमलात आणल्या आणि ज्येष्ठ नागरीक व बालगोपालांना जास्त सवलती देऊन अनेक योजना राबवल्या. त्यामुळे मंडळाची सभासद संख्या दिवसेंदिवस वाढतच आहे. मराठी संस्काराने भारावलेली मी एक 'आई' आहे. ही मंडळी एखाद्या मातेप्रमाणे त्यांच्या मंडळातील माणसांवर वात्सल्याचा आणि आपलेपणाचा वर्षाव करतात ते मी स्वत: अनुभवले आहे.

आमची सहल 'सिकोमी लेक'ला गेली त्यावेळी माझी नात फक्त दीड महिन्याची होती. निरंजनला म्हटले की, अरे, आपण हिला घेऊन कसे जायचे? तो म्हणाला, काही काळजी करू नको. आम्ही सर्व व्यवस्थित आयोजन केले आहे. तिला काहीच त्रास होणार नाही.

१० जुलै २०१० रोजी आम्ही लेकला पोहोचल्यावर तेथील मराठी वातावरणाने मी भारावून गेले. क्षणभर वाटले की मी माझ्या मातृभूमीवरच आहे. एकूण व्यवस्था लाजबाब होती. गेल्या गेल्या नाश्ता, कॉफी आणि शीतपेय! नंतरच्या जेवणातील भरपूर व्हरायटी पाहून तर मला खूपच आश्चर्य वाटले. प्रत्येकाने मनापासून बनवलेले पदार्थ पाहून सर्वांच्या तोंडाला पाणी सुटले. हे खाऊ की ते खाऊ अशी सर्वांची स्थिती झाली. सर्वांनी तृप्त होऊन पोटावर हात फिरवत असतांनाच आनंदाची भरात भर म्हणून निसर्गाने पण वर्षाव करायला सुरुवात केली. त्या पावसात काही जण क्रिकेट खेळत होते, काही चेंडू खेळत होते, काही पाण्यात पोहत होते. आम्ही जेष्ठ नागरिक मात्र गाण्याच्या भेंड्यांची मजा लुटत होतो.



हा सर्व आनंद लुटताना एकीकडे मंडळाच्या सदस्या सौ. संगीता तोरणे इतर दोघी तिघीसोबत अस्ताव्यस्त विखुरलेल्या सामानाची एकत्रित सांगड घालत होत्या. जाडजूड सामानांची हलवाहलव करायला पुरुषमंडळीही पुढे सरसावली होती. हे आवर्जून सांगण्याचा उद्देश म्हणजे आपल्याकडल्यासारखे इकडे नोकरचाकर नसतात. आपणच 'नोकर' व आपणच 'बॉस'! हे सर्व शिकण्यासारखे आहे. त्यामुळे आळस हा शब्द आपल्या यादीतून हद्दपार करावाच लागतो.

'सहल' खूपच अविस्मरणीय झाली. हे सर्व अनुभवतांना मी परदेशात आहे हेच मुळी काही काळ विसरून गेले. यातच या मंडळाचे यश दडलेले आहे. यापुढेही असेच कार्यक्रम आमलात आणून मराठीचे बीजारोपण सतत मराठी माणसांच्या मनामनात रुजवून त्याला प्रेम, वात्सल्य, अनुभव, अनेक योजनांचे खतपाणी घालून त्याची सर्वांगाने सुदृढ वाढ होईल याकडे मंडळ जातीने लक्ष पुरवेल, हीच माझी प्रार्थना आणि तुम्हा सर्वांना शुभाशीर्वाद.



## क्षणचित्रे:   मकर संक्रांति - २३ जानेवारी २०१०

















# क्षणचित्रे:   गुढी पाडवा - २७ मार्च २०१०





















क्षणचित्रे:   सहल - १० जुलै २०१०







# क्षणचित्रे:   गणेशोत्सव - १८ सप्टेंबर २०१०







# कुटुंबियासमवेत कार्यकारिणी



पाठक, तोरणे, देशपांडे, बोरसे

# सेतू बांधू या अंतरी

जीवन कायंदे

महाराष्ट्रातील अनेक निराधारांना मदत करणाऱ्या महाराष्ट्र सेवा समिती ऑर्गनायझेशनच्या कार्याची मंडळाच्या सदस्यांना माहिती व्हावी हा या लेखाचा मुख्य हेतू आहे. समितीच्या स्थापनेमागील विचारसरणी अतिशय उदात्त आहे. त्याला अनुसरून समितीने आजवर बरेच मोठे कार्य केलेले आहे.

आपल्यापैकी अनेक भारतीय कॅनेडियन रहवाशांचा जन्म आणि पालनपोषण भारतात झाले. त्यांचे बरेचसे शिक्षणही भारतातच पूर्ण झाले. कुठलीही किंमत न मोजता कॅनडाला ह्याचा फायदा मिळाला. भारतातील शिक्षणामुळेच आपणा सर्वांना कॅनडात येण्याची संधी मिळाली आणि त्यातून आपले जीवन सुखकारक झाले. भारतीय कॅनेडियन रहवाशांनी कोणत्या ना कोणत्या स्वरूपात भारताच्या उपकाराची परतफेड करायला हवी. ह्या विचारातून ऑगस्ट १९८४ मधे महाराष्ट्र सेवा समिती ऑर्गनायझेशनची स्थापना झाली.

गरीब निराधारांसाठी समितीने अनेक प्रकल्प राबविले. ह्या प्रकल्पांच्या लाभार्थीमधे निराधार महिला, लायक परंतु गरीब विद्यार्थी, अपंग, मतीमंद, अनाथ, आदिवासी, कुष्ठरोगी, झोपडपट्टीवासी, भटक्या जमाती, दृष्टीहीन, निष्पाप तुरुंगवासी, गांजलेले शेतकरी, भूकंपग्रस्त आणि इतर अनेकांचा समावेश होतो. निराधारांना मदत करताना त्यांना दान देण्याचा समितीचा उद्देश नसतो, तर स्वावलंबी होण्यासाठी त्यांना एक नवी संधी निर्माण करून द्यावी आणि स्वत:च्या पायावर उभे राहून त्यांना स्वाभिमानाने जगता येणे शक्य व्हावे असा हेतू त्यामागे असतो. ऑगस्ट २०१० मधे समितीला २६ वर्षेपूर्ण झाली.

गेल्या २६ वर्षांत गरीब निराधारांच्या मदतीसाठी समितीने ५० लक्ष डॉलर्सपेक्षा अधिक रक्कम भारतात पाठविलेली आहे. ५० लक्ष डॉलर्सच्या भरघोस रकमेमधे कॅनेडीयन इंटरनॅशनल डेव्हलपमेंट एजन्सी (सीडा) आणि आंतरराष्ट्रीय विकासासाठी स्वयंसेवी संस्थाना अनुदान देण्याचा अल्बर्टा सरकारचा उपक्रम या दोन स्त्रोतांचा सिंहाचा वाटा आहे. महाराष्ट्र सेवा समिती म्हणजे उत्तर अमेरिकेतील उदार देणगीदार आणि भारतातील नि:स्वार्थी समाजसेवक यांना जोडणारा साता समुद्रावर उभारलेला एक भक्कम सेतू आहे. अधिक माहितीसाठी www.mssoonline.org या संकेत स्थळावर आपण जरूर भेट द्यावी. समितीच्या कार्यकारिणीशी संपर्क साधायचा असल्यास info@mssoonline.org या पत्त्यावर ईमेल पाठवावी. समितीला दिलेल्या देणग्यावर आयकरातून सवलत मिळते.